जून २०१४ अंक ९

*Magzine on Low External Input Sustainable Agricultrue*

# LEISA INDIA

## लीजा इंडिया–मराठी



# आंतरराष्ट्रीय पारिवारिक शेतीवर्ष २०१४

जून २०१४ अंक १

लीजा-इंडिया हे नियतकालिक अे.एम.ई. फाऊंडेशन तर्फे प्रकाशित केले जाते. त्याची पहिली आवृत्ती मराठी भाषेत युवा रुरल असोसिएशन, नागपूर मार्फत लेखांचा मराठी अनुवाद करुन प्रकाशित करीत आहेत.


**मुख्य संपादक**
**के.व्ही.एस प्रसाद**
अे.एम.ई.फाउंडेशन

**व्यवस्थापकीय संचालक**
**टी.एम राधा**
अे.एम. ई. फाउंडेशन

**मराठी संपादन**
**दत्ता पाटील,**
युवा रुरल असोसिएशन

**मराठी अनुवाद**
डॉ. सरिता मोवाडे, दत्ता पाटील,
डॉ. विनोद खडसे, लक्ष्मीकांत पडोळे, सुरेश लुले

**अनुवाद समन्वयन**
**अरुण कुमार शिवराय**

**प्रशासन**
**रुक्मीनी जी.जी**
अे.एम. ई. फाअंडेशन



**युवा रुरल असोसिएशन**
23, दातीर निवास, न्यू अमरनगर, चिखली रोड,
मानेवाडा रिंग रोड,नागपूर - 440034.
फोन : +91-712-2743972 / 2743986
इमेल : info@yraindia.or
वेबसाईट : www.yraindia.org

**अे.एम.ई. फाउंडेशन**
नं. 204, 900 फूट रिंग रोड, 3 फेज, बानाशंकरी,
2 रा ब्लॉक, 3 री स्टेज, बंगलोर - 560075, भारत
फोन : +91-080-2669 9512, +91-080-26699522
ईमेल : + amebang@giasbg01.vsnl.net.in
फॅक्स : + 91-080-26699410



**छपाई :** दिनेश ग्राफीक, नागपूर

**मुख पृष्ठ फोटो :** एड इंडिया. ओआरजी


**लीजा इंडिया** हे जागतीक शेती नेटवर्क चा एक भाग आहे. भारतामध्ये हे नियतकालिक इंग्रजी, कन्नड, तमिळ, हिंदी, तेलगू, ओरिया, पंजाबी व मराठी भाषेतून छापले जाते. भारताशिवाय ते लॅटीन, अमेरिका, पश्चिम आफ्रिका, पूर्व आफ्रिका, ब्राझील व चीन या देशातून प्रकाशित होते.


नियतकालिकातील लेखन तपशील योग्य व काटेकोर असल्याची काळजी संपादकानी घेतलेली आहेत. परंतु मूळ लेखातील मते व अनुभव हे लेखकाचे वैयक्तिक असतील. तसेच लेखाच्या झेरॉक्स प्रती इतरापर्यंत मुख्य हस्ते प्रसारीत करण्याची खुली परवानगी आहे.


# प्रिय वाचक

आपणा सर्वांना लीजा इंडिया टीमतर्फे हार्दिक शुभेच्छा. लीजा इंडियाचा पहिला अंक मराठी भाषेत छापून आपल्या हातात द्यायला आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. महाराष्ट्रात जास्तीत जास्त लोकापर्यंत हा अंक पोहोचावा, अशी आमची मनोमन इच्छा आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाने सन 2014 हे आंतरराष्ट्रीय पारिवारिक शेती वर्ष घोषित केले आहे. पारिवारिक शेती म्हणजे एक 'जीवन शैली' असे म्हणता येईल. कुटुंबाच्या मालकीची, कुटुंबातील लोकांनीच केलेली, कुटुंबापुरती लहान शेती असा त्याचा अर्थ नाही. एक शेतीनिष्ठ संस्कृती, विविध गूण विशेष व कंगोरे असलेली शेतीप्रणाली असे म्हणता येईल. नोकरशाही तर्कशास्त्र, चाकोरीबध्द शास्त्रीय पध्दती तसेच औद्योगिक चाकोरीत बसणाऱ्या शेती पद्धतीला आव्हान देणारी अशी ही पारिवारिक कृषि प्रणाली म्हणता येईल. आपल्या सर्वांच्या सहकार्याबद्दल धन्यवाद !

अंक वाचून जरूर प्रतिक्रिया कळवाव्यात.

**संपादक मंडळ.**

**लीजा** म्हणजेच बाहेरील लागतीचा अत्यल्प वापर व शाश्वत शेती प्रणाली होय. ज्या शेतकऱ्यांना पर्यावर्णीय संतुलन न बिघडविता शेती उत्पादन व उत्पन्न वाढवायचे आहे अशा शेतकऱ्यांसाठी हा एक तांत्रिक व सामाजिक पर्याय आहे. स्थानिक संसाधनाचा व नैसर्गिक प्रगती यांचा शेती प्रणाली मध्ये यथायोग्य वापर आणि गरज पडल्यास केवळ काही बाह्य लागतीचा सुरक्षित व सक्षम वापर हे लीजाचे तत्व आहे. स्वतःचे उपजत ज्ञान, कौशल्य, मुल्ये व संस्कृतीच्या आधारावर आपले भविष्य उज्वल करण्याची उर्मी असलेल्या महिला व पुरुष शेतकऱ्यांचे हे एक उर्जास्थान आहे. शेतकरी आणि संबधित घटकांच्या सहभागी पद्धतीने क्षमतावृद्धी करणारं हे एक माध्यम आहे. एकंदर शेती प्रणाली सुधारणा व बदलत्या गरजांनुसार त्या मध्ये बदल करणे आणि होणारे बदल योग्य प्रकारे आत्मसात करण्यासाठी लीजा हे एक मार्गदर्शन आहे. लीजाद्वारे शेतीच्या पारंपारिक ज्ञान व शायकिय ज्ञानाचा काळजीपूर्वक मिलाप केला जातो व पुढे त्या आधारावर आवश्यक ध्येय धोरणे तयार करण्यासाठी प्रयत्न केला जातो. अशा धोरणांचा वापर, प्रसार, प्रचार करण्याचे देखिल हे साधन आहे. लीजा ही एक संकल्पना आहे, एक दृष्टीकोन व राजकीय संदेश आहे.

**MISEREOR** founded in 1958 is the German Catholic Bishops' Organization for Development operation. For over 50 years MISEREOR has been committed to fighting poverty in Africa, Asia and Latin America. MISEREOR's support is available to any human being in need - regardless of their religion, ethnicity or gender. MISEREOR believes in supporting initiatives driven and owned by the poor and the disadvantaged. It prefers to work in partnership with its local partners. Together with the beneficiaries, the partners involved help shape local development processes and implement the projects. This is how MISEREOR, together with its partners, responds to constantly changing challenges, (www.misereor.de; www.misereor.org)

**अे.एम. ई.** फाऊंडेशन पारंपारिक ज्ञान व नवनवीन तंत्रज्ञान यांचा संगम करून अत्यल्प बाह्य लागतीच्या तत्वावर नैसर्गिक संसाधनाचे उत्तम व्यवस्थापन सुनिश्चित करीत शाश्वत उपजिविकेला प्रोत्साहन देणारी संस्था आहे. हया हेतूने दख्खन भागातही संस्था लहान व छोट्या शेतकरी कुटुंबासोबत,शिक्षण,प्रशिक्षण,पारंपारिक ज्ञान साठवण,विविध संस्था संघटना सोबत अनुभवांची देवाण घेवाण करीत शेती पध्दतीचे विविध पर्याय सातत्याने शोधत असते. अगदी तळागाळात जाऊन गावातील इच्छुक शेतकऱ्यांसोबत त्यांना विविध फायदेशीर पर्याय उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न ह्या संस्थेतर्फे केले जातात. अशा ठिकाणी इतर अनेक शेतकरी, संस्था-संघटनांना शिकण्याची संधी म्हणून कार्यक्रम आयोजित केले जातात.

**युवा रुरल असोसिएशन** ही संस्था नैसर्गिक संसाधनाच्या संवर्धनासोबत त्यांच्या योग्य व्यवस्थापनावर आधारित ग्रामीण व आदिवासी क्षेत्रात गरिबीवर मात करण्यासाठी नवनवीन उपजिवकेचे प्रयोग व पर्याय निर्माण करण्यास लहान शेतकरी, शेतमजूर, आदिवासी व ग्रामीण गरीब समुहास मदत करीत असते. यामध्ये माहितीसाठी विशेष प्रयत्न केले जातात.शेती व शेतकरी संबधित विविध प्रश्नांवर धोरणात्मक पातळीवर योग्य ते निर्णय व बदल घडवण्याचा विशेष प्रयत्न इतर राज्य व राष्ट्रीय पातळीवरील संघटनां सोबत केले जातात. लीजा इंडियांचे नियत कालिक मराठी मध्ये प्रकाशित करण्याची सुरुवात हा देखिल त्याचाच एक भाग आहे.

# अनुक्रमणिका

जून 2014 अंक -1 ला

**4-6** **'पारिवारिक शेती' म्हणजे काय ?**

मूळ लेखकः जेन डोने नॅन डेर फ्लोएग



संयुक्त राष्ट्र संघाने 'जागतिक पारिवारिक शेती' वर्ष जाहीर केले असले तरी या संकल्पने बाबत अद्याप संभ्रम आहे. हे नेमके काय आहे? त्यात काय विशेष आहे ? उद्योगशिल शेती किंवा 'पारिवारिक शेती उद्योग' या पेक्षा त्यात वेगळे काय आहे ? ज्या भागात आधुनिक शेतीपद्धती अंमलात आणली जात आहे तेथे जास्त मोठ्या प्रमाणात संभ्रम होण्याच्या शक्यता आहेत 'जागतिक पारिवारिक शेती वर्षा' च्या सुरुवातीला जॅने डोने यांनी त्यांच्या संकल्पना सोप्या करण्याचा प्रयत्न केला आहे. वादातीत असणाऱ्या ह्या शेती पद्धतीच्या जवळ ते आपणास घेऊन जात आहेत.

**7-9** **SRI (धानाच्या वाढीव उत्पादनाची पद्धत) - क्रांती धान (तांदूळ) क्रांती**

मुळ लेखक : अनिलकुमार वर्मा



'' नविन शोध टिकवायचा असेल तर त्याला आधाराची गरज असते. तोच छोटा शोध मग क्रांती मध्ये रूपांतरीत होतो, जर शासन/ प्रशासना मार्फत अशा नव्या शोधांना ती पोच पावती मिळाली व भक्कम पाठिंबा मिळाला तर अशाच एका छोट्या शोधाचे क्रांती मध्ये रूपांतर झाल्याने राज्यातील अन्नधान्याचे विक्रमी उत्पादन कसे होते हे बिहार सरकारने दाखवून दिले.''

**10-12** **शेतकरी उत्पादक संस्था-ग्राहक विक्री मुल्यांमध्ये शेतकऱ्यांचा वाटा वाढविण्यासाठीचा यशस्वी प्रयत्न**

मुळ लेखकः पी.नंदीशा, आर. संजीव व आर.एस.एस. होपर



मुत्तलुरचे शेतकरी एकत्र येऊन शेतकरी उत्पादक संस्था (FPO) स्थापन करून शेतमालाच्या ग्राहक विक्रीमुल्यात जास्तीत जास्त वाटा मिळवीत आहेत. उत्पादक संस्था स्थापन केल्यामुळे शेतकऱ्यांची व्यापारी व दलाल यांच्या मार्फत होणारी लूट तर थांबलीच, परंतू नविन बाजारपेठा, वेळेवर पतपुरवठा व उत्कृष्ठ कृषि निविष्ठा उपलब्ध झाल्या. हे सर्व शेतकऱ्यांच्या सामुहिक व संघटीत प्रयत्नांमुळे शक्य झाले आहे.

**13-15** **लहान शेतकरी - मोठा बदल**

मूळ लेखक : झकिर हुशेन, जी.व्ही. रामंजेनेयुलु, जी.राजशेखर व जी.चंद्रशेखर



कृषिजैव विविधतेला प्रोत्साहन देण्याच्या हेतूने ज्ञान वाढ करणे, प्रयोग करणे व त्याचा इतरांपर्यंत प्रचार/प्रसार करणे अशा स्वरूपाचा कार्यक्रम, ऑक्सफाम नोबिव व हिंवास यानी 'कृषि जैव विविधता ज्ञानवृद्धी कार्यक्रम' (ॲग्रीकल्चर बायो-डायव्हर्सिटी नॉलेज प्रोग्रॅम) या नावाने सुरू केला आहे. प्रचिलित- महागडया रासायनिक कृषि निवीष्ठांच्या आधारावर उभ्या असलेल्या कृषि पद्धतीमध्ये अमुलाग्र बदल घडवून जैव विविधतेवर आधारित कृषिप्रणाली निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा हेतू आहे. प्रत्यक्ष शेतकऱ्यांचा फायदा, निसर्गाची जोपासना, पुरेशा व सकस आहाराची खात्री, शेतकरी व त्यांच्या उपजत ज्ञानाचा, त्यांच्या निवडीचा आदर या सर्व बाबी या कार्यक्रमाचे प्रमुख भाग आहेत. 'कुटुंबासाठी शेती व शेतीसाठी कुटूंब' या अवस्थेत असणाऱ्या लहान शेतकऱ्यांनी अनेक वर्षांपासून करीत असलेल्या रासायनिक शेती पद्धतीमध्ये बदल घडवून आणलेल्या यशस्वी प्रयोगांची व अनुभवांची मांडणी भारतातील आंध्रप्रदेशमधील 'सेंटर फॉर सस्टेनेबल ॲग्रीकल्चर' या संस्थेमार्फत या लेखात केली आहे.

**16-17** **देशी तांदूळाचे पूनरागमन**

मूळ लेखक : सीमा ग. प्रसाद



सहजा समृध्द, सेंद्रिय शेतकऱ्यांचे एक संघटन, ज्याने एका दशका अगोदर शाश्वत शेतीच्या कल्पना, बियाणे आणि ज्ञानाच्या देवाण घेवाणाची मुहर्तमेढ रोवली. तिच्या दमदार सुरुवातीपासून आजतागायत देशी बियाण्यांचे पुनरूजीवन अभियानाद्वारे भारतीय शेती पद्धतीत नवचतैन्य निर्माण करणारी एक ताकतवर संस्था म्हणून उद्यास आली.

**18-20** **बदलाच्या लाटेत टिकाव मेंढापाळाची द्विधावस्ता**

मूळ लेखकः नित्या सांबामुर्ती घोटगे



सेलफोन व इंटरनेट सारख्या साधनानी सध्याच्या माहितीच्या जगात बळकावलेली जागा पुन्हा पारंपारिक ज्ञानाला काबीज करता येणे कठीण आहे. बदलाच्या वाऱ्याची गती लक्षात घेता हे एक मोठे आव्हानच आहे. तुटपंजी शेती आणि गुराढोरांचा सांभाळ याच्यावर या बदलाचे प्रचंड विपरित परिणाम झालेले दिसतात. किंबहुना ह्या बदलाच्या गतीला सामोरे जाण्याची कुवत नसल्याकरणाने ते जणू सपुंष्टातच येत आहेत. सद्याच्या विस्तार व शिक्षणासाठी अस्तित्वात असलेल्या व्यवस्थांमध्ये अमुलाग्र बदल घडवणे हा एकमेव मार्ग अशा लहान शेतकऱ्यांना व मेंढपाळाना बदलाच्या सुसाट वाऱ्यासोबत तग धरून राहण्याची ताकत देऊ शकतो.



*पारिवारिक शेती मध्ये शेतकरी स्वतःच्या श्रद्धेने, परिश्रमाने आणि जिवाभावाने शेतीविकास करतो.*

# 'पारिवारिक शेती' दहा गूणधर्म

**मूळ लेखक : जेन डोने नॅन डेर फ्लोएग**

**संयुक्त राष्ट्र संघाने 'जागतिक पारिवारिक शेती' वर्ष जाहिर केले असले तरी या संकल्पनेबाबत अद्याप संभ्रम आहे. हे नेमके काय आहे ? त्यात काय विशेष आहे ? उद्योगशिल शेती किंवा 'पारिवारिक शेती उद्योग' या पेक्षा त्यात वेगळे काय आहे ? ज्या भागात आधुनिक शेती पद्धती अमलात आणली जात आहे तेथे जास्त मोठ्या प्रमाणात संभ्रम होण्याच्या शक्यता आहेत.**

**'जागतिक पारिवारिक शेती वर्षा' च्या सुरुवातीलाच जॅने डोने यांनी त्यांच्या संकल्पना सोप्या करण्याचा प्रयत्न केला आहे. वादातीत असणाऱ्या ह्या शेतीपद्धतीच्या जवळ ते आपणास घेऊन जात आहेत. !**

**'पारिवारिक शेती' म्हणजे काय ?**

'परिवारिक शेती' ही संकल्पना तशी गुंतागुतीची आहे. समजायला फार सोपी नाही. पाश्चिमात्य समाजाला समजण्यासाठी तर ती कठीणच आहे. नोकरशाही विचार प्रणाली, तर्कशास्त्र चाकोरीबद्धपणा आणि औद्योगिक चौकटीतील दृष्टीकोण ह्याला आव्हान देणारी, त्याच्या पलिकडे जावून एक शेती संस्कृती, किंवा कृषिप्रणाली असे 'पारिवारिक शेती' ला संबोधता येईल. कधी दिशाभूल करणारी, भूरळ पाडणारी शेती पद्धती असे वाटते. ह्या संकल्पनेला विविध कंगोरे आणि विविध स्तर आहेत. ही संकल्पना सविस्तरपणे समजून घेण्यासाठी हीचे विविध दहा पैलू मी या लेखात मांडण्याचा प्रयत्न करीत आहे. कोणत्याही एका विशिष्ट परिस्थितीमध्ये हे सर्वच पैलू/ गूणविशेष एकाच वेळी सारखेच आढळतील असे मात्र शक्य नाही. महत्वाची गोष्ट म्हणजे 'पारिवारिक शेती' म्हणजे परिवाराच्या मालकीची शेती व त्यामध्ये केवळ परिवारातील सदस्यच काम करतात व शेती उत्पादन केवळ परिवारापुरतेच वापरतात वगैरे सारखा मर्यादित अर्थ या संकल्पनेचा नाही हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. किंवा ती शेती किती लहान किंवा किती मोठी हा त्याचा भाग नसून ती शेती कशा प्रकारे केली जाते हा भाग

महत्वाचा आहे. म्हणून 'पारिवारिक शेती' म्हणजे एक 'जीवन शैली' असे म्हणता येईल.

**'शेती' व 'परिवार' या दोहोंचा समतोल**

'परिवारिक शेती' संकल्पनेचे दहा पैलू/गूण विशेष आपण आधिक समजावून घेऊ.

1. **प्रमुख संसाधनावर परिवाराचे नियंत्रण :-** प्रमुख संसाधनावर शेतकरी कुटुंबाचे नियंत्रण असणे हा अत्यंत महत्वाचा पैलू आहे. यामध्ये शेत जमिन, गुरे ढोरे, पिके, जणुकीय साहित्य, शेतघर, इमारत, यंत्रसामग्री इ.चा समावेश होतो. विशेषतः या सर्व साधनांचा व संसाधनाच्या योग्य वेळी योग्य वापर कसा करायचा याचे ज्ञान महत्वाचे असते. बाजार, सहकार, क्रेडीट इत्यादी संस्थाचे जाळे, त्यामध्ये परिवाराची पोहोच व समान भागीदारी हा भाग सुद्धा महत्वाचा असतो.

पारिवारिक शेतकरी या सर्वांचा वापर केवळ नफा मिळवण्यासाठी नव्हे तर एक 'जीवन पद्धती' उभारण्यासाठी करीत असतो. त्यातून एक सुखी समृध्द जीवन जगता येईल व शेती अधिक समृध्द बनवण्यासाठी गरजे नुसार कांही गुंतवणूक करता येईल. या मध्ये गरजेनुसार यंत्रसामुग्री, सिंचन व्यवस्था किंवा परिवाराने स्वतः उभारलेली आवश्यक सामग्रीचा वापर गरजेनुसार करणे देखिल आंर्तभूत होते.

2. **शेतीसाठी प्रमुख श्रम परिवारातील सदस्याचे :** ह्या संकल्पनेचा दुसरा पैलू म्हणजे शेती करण्यासाठी लागणारी मेहनत ही त्या परिवारातील सदस्याचीच जास्त असते त्यातूनच अशी शेती हे स्वयंरोजगाराचे आणि परिवाराच्या प्रगतीचे केंद्र बनून जाते. अशा सदस्यांच्या कठोर परिश्रमातून, त्यांच्या त्यागातून आणि भावनिक गुंतवणुकीतूनच विकसीत होते आणि कुटुंबाच्या आणि उपजीविकेचे भक्कम साधन बनते.

3. **शेत व परिवार यातील मजबूत नाते :** कुटुंबाच्या अनेक गरजा शेत भागवते आणि कुटूंब देखिल खूप कांही शेतीला पुरवते असे अगदी घट्ट व मजबूत परस्परावलंबी जीवन अशा शेतकऱ्यांचे असते. त्यातूनच शेतीचा विकास कसा घडवून आणायचा या बाबतचे निर्णय घेतले जातात. शेतीवर खाणारी तोंडे आणि शेतीला फुलवणारे तेच बाहूबळ असे प्रत्येक शेताचे संतुलीत नाते ठरलेले असते. हे नातेच खऱ्या अर्थाने ते 'शेत' आणि 'परिवार' यांना एकमेकांशी घट्ट बांधून ठेवत असते. दुसऱ्या भाषेत जर परिवारातील बहुतेक सदस्यांची भूक बाजारातील/ बाहेरच्या वस्तूमुळे भागत असेल तर हे नाते ठिसूळ होण्याची शक्यता आहे. अशा वेळी 'शेती' चा उपयोग केवळ नफा मिळण्यासाठी होऊ शकतो व जीवनशैली पूर्ण बदलून जाऊ शकते. नाते संपुष्टात येऊ शकते.

**भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळ यांची सांगड**

**4. पारिवारिक शेती -** परिवाराच्या गरजा व अन्न पुरवते केवळ मालकी आणि श्रम या पलिकडे जाऊन पारिवारिक शेती त्या परिवाराच्या बऱ्याच गरजा आणि लागणारे अन्न पुरविते. अन्न धान्यावर नियंत्रण असणे, आणि असे अन्न प्रदूषित नसल्याची खात्री असणे हे आता खूप महत्वाचे झाले आहे. पारिवारिक शेती मध्ये हे नियंत्रण आणि खात्री सहज प्राप्त होते.

**5. निर्मिती ठिकाण (कारखाना) नव्हे तर घर :** पारिवारिक शेती करणाऱ्या शेतकऱ्याची शेती हे केवळ निर्मितीचे ठिकाण किंवा कारखाना नसतो तर ते घरच असते. ती त्यांची स्वतःची जागा असते. आसरा देणारी ती जागा असते. आधार, पाठिंबा आणि बळ देणारी ती जागा असते. कुटुंबाच्या वास्तव्याची जागा असते. तेथे मुले लहानाची मोठी होत असतात.

**6. शेतकरी परिवार हा भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्य काळात जोडणाऱ्या प्रवाहातील महत्वाचा दुवा :** थोडक्यात प्रत्येक शेताला एक इतिहास असतो. अनेक आठवणींचा खजिना असतो तो. आई वडील आपल्या मुलांसाठी या शेतावर काम करीत असतात. ते आपल्या मुलांना त्यांच्या जीवनाची सुरुवात करण्यासाठी एक ठोस पर्याय शेतीतच किंवा शेतीच्या बाहेर - देण्याचा प्रयत्न करीत असतात. याच प्रकारे ह्या शेतीतच पिढ्यान पिढ्या जन्माला येत असतात. त्यांचे भाग्य/ भविष्य घडत असते, ही शेती त्यामुळेच एक अभिमानाची जागा होऊन राहते. ह्या जागेचा (शेतीचा) जर कोणी विनाश करू पहात असेल किंवा नुकसान पोहोचवू पहात असेल तर चीड निर्माण होते.

**7. परिवारिक शेत ही अशी जागा आहे की तेथे अनुभवांचे गाठोडे पहावयास मिळते :** ह्याच ठिकाणी शिकवण होते. शिकवण साठवली जाते. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जाते. अगदी सहज पण ठोस शिकवण होते. शेती क्षेत्रातील तो एक छोटासा बिंदू असतो, जेथे नवनवीन कल्पना सुचतात, प्रत्यक्षात येतात, अंगवळणी पडतात, नवीन पद्धती विकसीत होतात, नवे बीज निर्माण होतात व सर्वत्र पसरतात.

**पर्यावरणातीलच एक भाग**

**8. संस्कृती निर्मीती व जतन :** 'पारिवारिक शेती' म्हणजे केवळ नफा मिळवण्याचे आर्थिक साधन नव्हे पण अशी जागा की जेथे सातत्य आणि संस्कृती जोपासली जाते. शेती निष्ट कुटूंब हे संपूर्ण ग्रामीण समाज Network चा हिस्सा असते व अनेकदा ते शहरापर्यंत जावून पोहोचते.

**9. 'पारिवारिक शेती' मधील 'परिवार' आणि 'शेत' हे दोन्ही ग्रामीण अर्थकारणाचा महत्वाचा हिस्सा आहेत.** त्या त्या स्थानिक स्वभाव विशेषाचे व सांस्कृतिक चालीरितीचे ते अविभाज्य भाग आहेत. यातूनच ते स्थानिक अर्थकारण मजबूत करतात. याच अर्थकारणात त्यांना जे हवे ते विकत घेतात, त्यांच्याकडे आहे ते विकतात (विनिमय करतात) आणि इतर घडामोडी सोबत जोडले जातात.

**10. पारिवारिक शेती - व्यापक ग्रामीण वास्तवाचा भाग :** 'पारिवारिक शेती' व्यापक पातळीवर निसर्गाशी मिळतं जुळतं घेणारी किंबहुना निसर्गाचा एक भागच असल्या सारखी आहे. निसर्गाच्या विरोधात न जाता, नैसर्गिक प्रक्रियांच्या आधारावर, किंबहुना त्या प्रक्रियाना टिकवण्यासाठी पुरक म्हणजेच पारिवारिक शेतीपद्धती होय. ही पद्धत निसर्गातील जैवविविधता टिकवण्यासाठी मदत करते आणि 'ग्लोबल वॉर्मींग' शी लढत देवू शकते.

**स्वातंत्र्य आणि स्वायत्तता**

पारिवारिक शेती मध्ये स्वायत्ता असल्यामुळे त्याचे एक वेगळे आकर्षण आहे. यामध्ये दोहोबाजुंनी स्वातंत्र्य आहे - एक म्हणजे बाहेरील शोषण कर्त्यापासून स्वातंत्र्य आणि दुसरे म्हणजे स्वतःच्या इच्छा/ गरजानुसार काम करण्याचं स्वातंत्र्य आहे. या सोबतच रोजच्या कामामध्ये जीवंत निसर्गाशी सातत्याने देवाण घेवाण असते. पारिवारिक शेती म्हणजे शारिरीक व बौद्धिक श्रमांचा सुरेख संगमच आहे, ज्यामध्ये काम व जीवन आणि निर्मीती तसेच विकास ही खूप महत्वांची अंगे आहेत. ही एक संस्थांच आहे की जी सद्याच्या भांडवलशाही विश्वात सात्तत्याने निर्मीती करीत राहते. अगदी प्राणवायू नसलेल्या वातावरणात एखाद्या बॅक्टेरियाने जगण्यासारखे हे निर्मितीचे काम अविरत चालूच राहते.

### ह्याचे महत्व काय ?

पारिवारिक शेती मुळे जास्त उत्पादन क्षम, शाश्वत, बदलता येण्यासारख्या, प्रतिसादात्मक, नाविण्य पूर्ण व जिवंत अशा शेतीच्या विविध पध्दती विकसित होतात, जतन होतात. ह्या सर्व समावेशकते मुळे पारिवारिक शेती अन्न सुरक्षा व अन्न सार्वभौमत्वा मध्ये मोठा वाटा उचलण्याची शक्यता असते. विविध मार्गानी ही शेती पध्दती आर्थिक विकासामध्ये भर टाकू शकते, रोजगार व मिळकत वाढीचे मार्ग निर्माण करू शकते. समाजातील मोठ्या संख्येने लोकांना यामुळे काम मिळू शकते आणि अशा दारिद्र्यामध्ये असणाऱ्या अनेकांना दारिद्र्याच्या संकटातून बाहेर काढू शकते. तसेच सर्वात महत्वाचे म्हणजे पारिवारिक शेती प्रणाली ही निसर्गाची सुंदरता व जैवविविधिता टिकवण्यामध्ये सिहांचा वाटा उचलणारी ठरू शकते.

### बाहेरील धोके

पण ह्या सर्व फायद्याच्या बाबी अगदी अशक्य होण्याच्या शक्यता ही आहेत. फोल ठरण्याच्याही शक्यता आहेत. आज वास्तविकपणे पारिवारिक शेती प्रणाली ला दुबळे बनविले आहे. शेतमालाच्या किंमती कमी झालेल्या असतात पण शेतीचा लागत खर्च मात्र वाढलेला असतो. बाजारचा लहरीपणा मुळे कोणतेही दूरवरचे पीक नियोजन करणे दुरापास्त होते. कांही वेळा बाजारा सोबत वाटाघाटी शक्य नसतात. कृषि धोरणांमध्ये पारिवारिक शेतीला स्थान नसते. जमिन आणि पाणी ही महत्वाची संसाधने मोठ्या भांडवलदारानी काबीज केलेली असतात. आणि अशा अवस्थेमध्ये 'पाविरिक शेती' संकल्पना राबवणे महाकठीण/ अशक्य होते. व्यापक समाजाला योगदान देणे सोडाच पण स्वतःच्या परिवारासाठीचे योगदान सुध्दा अशक्य होऊन बसते. याच कारणामुळे सद्या 'पारिवारिक शेती' 'प्रणाली' कालबाह्य झाल्यासारखी वाटते. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर जगातील 70 टक्के गरिब लोक हे ग्रामीण परिसरातच राहतात कारण ते सर्व पारिवारिक शेती करत होते. आणि आता ती पारिवारिक शेती कोडमडली आहे. म्हणून ते सर्वजण दारिद्र्यामध्ये आहेत.

### अंतर्गत धोके

या पध्दतीमध्ये आतंर्गत धोके देखील आहेत. आज वास्तविक शेती ही एखाद्या उद्योगासरखीच होऊ शकते असे बोलले जाते. नफा मिळवण्यासाठीच शेती करणे परवडते असे सर्वानाच वाटते. कांहीच्या मते असे केल्यास कदाचित आताची तरूण पिढी शेत मध्ये थोडा तरी टिकाव धरतील. थोडक्यात पारिवारिक शेती आता जीवन पध्दती नव्हे तर एक 'उद्योग' ह्या दृष्टीने पाहणे योग्य या विचार धारे नुसार दक्षिण मधील (Global South) 'पारिवारिक शेती' चे सक्रंमण उत्तरीय देशात जसे झाले त्या प्रमाणे सुधारित शेती मध्ये करावे लागेल.

युरोपमध्ये असा बदल सर्वत्र घडून आला आहे. या मध्ये परिवारिक शेती पध्दतीचे वर मांडलेले सर्व पैलू संपूष्टात येऊन केवळ 'कामगार पुरवठा' एवढाच एक भाग त्या मध्ये शिल्लक राहतो असे दिसते. तसे पहायला गेले तर ही बदललेली औद्योगिक शेती अजून ही 'कुटूंबाची शेतीच' आहेत परंतू त्या मध्ये व 'पारिवारिक शेती' मध्ये बरेच मुलभूत फरक आहेत. सर्वात महत्वाचा फरक असा की खरी पारिवारिक शेती ही जाणिवपूर्वक नैसर्गिक, आर्थिक आणि मानवी संसाधनाचे उत्तम व्यवस्थापन करून आणि पूर्वीच्या पिढीपासून चालत आलेल्या ज्ञानाचा योग्य उपयोग करून वाढवली जाते. परंतू औद्योगिक शेती पध्दती मध्ये इतरांची कौटूंबिक शेती हस्तगत करून औद्योगिक पध्दतीने ती वाढवली जाते. ह्यामुळे पारिवारिक शेती पध्दती टिकवायला सर्वात मोठा अंतर्गत धोका निर्माण होतो. आज आपण हे सर्वत्र पाहतो आहोत.

### पारिवारिक शेती -छोटी शेती च्या दिशेने

याबाबत परसरविरोधी मानसिकता आहेत. अनेक ठिकाणी पहायला मिळते की पारिवारिक शेती पध्दती मध्येच कांही छोटे मोठे बदल करून ही पध्दती आणखी मजबूत बनवली आणि कुटूंबाचे उत्पन्न वाढवले. उदारहणार्थ शेती - पर्यावरणीय मूलतत्वाना अनुसरून, नविन उपक्रमाची सुरूवात करून, नविन पिके घेऊन, नविन प्रकारच्या सेवा देऊन, प्रक्रिया करून, नविन बाजाराची साखळी बनवून, चांगल्या भावाने आपला माल विकून अशी शेती प्रणाली वाढीव उत्पन्न देणारी व मजबूत बनवल्याची अनेक उदाहरणे आहेत.

विश्लेषनात्मक दृष्ट्या ह्या नविन गोष्टींना आत्मसात करण्याच्या रणनितिलाच पुन्हा पारिवारिक शेती प्रणालीच्या दिशेने जाणे असे म्हटले जाते. हे एका अर्थाने छोट्या शेतीत रूपांतरीत झाल्या सारखे वाटते. परंतू पारिवारिक शेती प्रणाली मजबूत केली जाते. म्हणजेच छोटी शेती एका अर्थाने पारिवारिक शेती प्रणालीला समर्थक आणि वाचवणारीच ठरते.

### काय करावे ?

'पारिवारिक शेती' प्रणाली साठी शासकीय धोरण अत्यंत महत्वाचे आहे. अगदी प्रतिकूल अवस्थेमध्ये सुध्दा 'पारिवारिक शेती' पध्दती तग धरून राहू शकेल. परंतू अनुकूल पारिस्थिती निर्माण झाल्यास ही शेती प्रणाली सर्वांगाने उच्चांक गाठेल. म्हणजेच यासाठी धेय धोरण बनवण्याची मोठी जबाबदारी संबधित देशाचे सरकार, आंतरराष्ट्रीय संस्था (उदा. **FAO, IFAD,** सयुंक्त राष्ट्र संघ)राजकीय पक्ष, सामाजिक चळवळी आणि समस्त नागरी समाज यांच्यावर जाते.

त्यांच्या मुलभूत हक्कांची हमी, पायाभूत संरचना उभारणीवरील गुंतवणूक संशोधन व विस्तार शिक्षण, नविन बाजार व्यवस्था, सामाजिक सुरक्षा, आरोग्याची हमी अशा मुलभूत सुविधा व अधिकारांची हमी दिल्यास शेतीकरी परिवार स्वतःचीच गुंतवणूक वाढवून 'पारिवारिक शेती' प्रणालीला प्रोत्साहन देतील. या गोष्टीला 'अन्न व सकस आहार - उच्चस्तरीय तज्ञ सामितीने अलिकडेच दुजोरा दिला आहे.

ग्रामीण लोकांच्या संस्था संघटना बळ देवून त्याना पुढे आणणे तितकेच महत्वाचे आहे. आपण हे मान्य केले पाहिजे की जगाच्या पाठीवर कोठेही शेतकरी कुटूंब हे बदलत्या परिस्थितीत तोंड देऊन अगदी कठिण परिस्थितीचा सामना करण्यास ही तयार आहेत. नविन मार्ग शोधत आहेत. अशा नविन व यशस्वी प्रयोगांना शोधांना समजणे; त्यांना नीट विकसित करणे, इतर ठिकाणच्या अनेक शेतकऱ्यांपर्यंत असे प्रयोग पोहोचवणे व बदलाच्या प्रवाहात त्यांना पाठबळ देणे हे आपल्या सर्वांच्या समोरचे मोठे काम आहे. बरेच काही करण्यासारखे आहे. आंनदाची बाब ही आहे की अगदी लहान सहान योगदान, बदल एका मोठ्या बदलाचा भाग असतो, मोठा बदल साकारतो.

***जेन डोवे वॅन डेर प्लोएग***
*ग्रामीण समाज शास्त्राचे प्रोफेसर*
*वॉशिंग्टन युनिव्हरसिटी आणि चायना कृषि विद्यापीठ*
*संपर्क : jandauwe.vanderploeg@wur.nl*
***मराठी अनुवाद : दत्ता पाटील***
***मूळ लेख : Ten qualities of family farming (Vol. 15, No. 4, Dec-2013)***



*गावा तील अनेक महिलांनी धानाच्या पिकासाठी ही पद्धत अवलंबली आहे.*

# SRI (धानाच्या वाढीव उत्पादनाची पद्धत) - क्रांती

## धान (तांदूळ) क्रांती

**मुळ लेखक : अनिलकुमार वर्मा**

**'' नविन शोध टिकवायचा असेल तर त्याला आधाराची गरज असते. तोच छोटा शोध मग क्रांती मध्ये रूपांतरीत होतो, जर शासन/प्रशासना मार्फत अशा नविन शोधाना ती पोचपावती मिळाली व भक्कम पाठिंबा मिळाला तर अशाच एका छोट्या शोधाचे क्रांतीमध्ये रूपांतर झाल्याचे राज्यातील अन्न - धान्याचे विक्रमी उत्पादन कसे होते हे बिहार सरकारने दाखवून दिले.''**

सन 2007 मध्ये सर्वप्रथम बिहार राज्यातील गया जिल्ह्यात, महिला शेतकरी वर्गाला त्यांच्या शेतात SRI पद्धती वापरण्यास प्रोत्साहित करण्याच्या एकमेव उद्देशाने मी आलो होतो. SRI पद्धतीबाबतची चर्चा मी बोधगया ब्लॉकमध्ये शेखवारा गावात आयोजीत केली होती.

सुरुवातीला मला ह्या कामात काही अडचणी येतील हे अपेक्षित होतेच. त्यावेळी ह्या पद्धतीला समजून घेण्याची व त्याचा वापर करण्याची शेतकऱ्यांची अनिच्छा व अतिशय थंड अशी प्रतिक्रिया बघून मला आश्चर्यच वाटले. तेथे उपस्थित असलेल्या शेतकऱ्यांमध्ये माझ्याबद्द कुजबुज सूरू होती. 'हा माणूस आपल्याला मुर्ख समजून आपले ह्या पद्धतीकडे मन वळवायला आला आहे. आपण कितीतरी पिढ्यांपासून धान पिकवितो आहे. आपल्याला धानाचे तंत्र बरेच चांगले माहीती आहे' असे त्यांचे आपसात बोलणे सुरू होते. शेतकऱ्यांचा असा शून्य प्रतिसाद बघून, मी चर्चा संपवून बाहेर निघालो. तेवढ्यात एक महिला शेतकरी श्रीमती कुन्तीदेवी समोर आली व जणू माझ्यावर दया करत तिने ह्या पद्धतीचा स्वतःच्या शेतावर अवलंब करण्याची इच्छा दाखविली. त्यासाठी तिला काही काळासाठी शेजारी शेतकऱ्यांचा व कुटुंबियांचा रोष पत्करावा लागला. पण 12 ते 15 दिवसांतच SRI पद्धतीतील पिकांची स्थिती बघून इतर शेतकऱ्यांचे मत बदलायला लागले.

नंतर पुढे जावून श्रीमती कुन्तीदेवीने एक हेक्टर जमिनीतून 9 टन धानाचे पिक काढले. तेव्हा तर बाकी शेतकऱ्यांचा विश्वास पक्का झाला. ह्यानंतर शेखवारा गावातून व इतर शेजारच्या गावातून जास्तीत जास्त महिला शेतकरी वर्ग ह्या पद्धतीकडे आकर्षित झाल्या व श्रीमती कुन्तीदेवी सोबत चर्चा करायला लागह्या. अशाप्रकारे गया जिल्ह्यांतील जवळजवळ 100 पेक्षा जास्त शेतकरी व नालंदा जिल्ह्यांतील 25 पेक्षा जास्त महिला

शेतकरी गटाने ह्या पद्धतीचा आपल्या शेतात अवलंब केला. ह्या प्रक्षेत्र शेतावर कृषिविज्ञान केंद्राचे संशोधक, बिहार कृषि विद्यापीठाअंतर्गत असलेले शेती विज्ञान केंद्राचे संशोधक, तसेच सरकारी केंद्राचे संशोधक व आत्मा (कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन संस्था) चे संशोधक ह्यांनी भेट दिली. नंतर पिके कापणीच्या वेळी सर्व अधिकारी वर्गाला व शास्त्रज्ञांना प्रक्षेत्र शेतावर बोलावून, समोर पिकाचे उत्पन्न मोजण्यात आले होते, जे की 12.5 टन/हेक्टर असे होते.

ह्या भेटीत, मगध विभागाचे कृषिनिर्देशक उपस्थित होते. SRI पद्धतीने घेतलेल्या पिकाच्या उत्पादनातील परिणाम बघून ते चांगलेच प्रभावित झाले. एवढेच नाही तर त्यांनी आपल्या सहकारी अधिकाऱ्यांना व वरिष्ठांना ह्या प्रक्षेत्र शेतावर निमंत्रीत केले. तसेच ह्या भेटीत त्यांनी जास्तीत जास्त शेतकऱ्यांना ह्या पद्धतीकडे वळविले.

शेतकऱ्यांचा वाढलेला प्रतिसाद बघून आम्ही येणाऱ्या वर्षासाठी मोठी संख्या सुनिश्चित केली. आम्हाला ह्यावेळी आशा होती की, आम्ही जवळजवळ 2000 शेतकऱ्यांसोबत ह्या पद्धतीवर काम करू. परंतू वास्तविकता काही वेगळीच होती. जवळजवळ 5000 शेतकऱ्यांनी ही SRI पद्धती आपल्या शेतवार राबविली. नालंदा जिल्ह्याचे जिल्हा कृषि अधिकारी व पटना येथील जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने, बिहार राज्य सरकार चालवित असलेल्या 'बिहार ग्रामीण आजिविका उत्तेजन सोसायटी' चे मुख्य अधिकारी ह्यांनी ह्या कार्यात विशेष रूची घेतली व शेतकऱ्यांच्या शेतावर वारंवार भेटी दिल्या. त्याचप्रमाणे जिल्हा अधिकारी व आयुक्त ह्यांनी देखील शेतकऱ्यांच्या शेतांना भेट देवून शेतकऱ्यांचे अभिनंदन केले व पुन्हा प्रोत्साहीत केले. त्यांच्या क्षेत्रातील लोकांच्या खाद्यान्न सुरक्षेला कायम ठेवण्यात त्यांच्या सहभागाबद्दल त्यांचे कौतुक केले.

प्रदान नावाच्या संस्थेने SRI पद्धतीवर आधारित ह्या दोन्ही जिल्ह्यांत कार्यशाळेची साखळीच सुरू केली. त्यात शेतकऱ्यांची SRI पद्धतीवर आधारित यशाची गीते, नाटके ह्यांचा समावेश होता. ह्यानंतर SRI शेतकऱ्यांचे अधिवेशन व संमेलन सुरू झाले. त्यामुळे आम्ही एक संस्था म्हणून व आमच्या यशस्वी शेतकऱ्यांना SRI शेतकरी म्हणून एक वेगळी ओळख/किर्ती मिळायला लागली. वेळोवेळी SRI शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनात उच्चांक गाठण्यासाठी स्वतःचे अनुभव व यशोगाथा व्यक्त करण्यासाठी शासनातर्फे आयोजित शेतकरी मेळाव्यात आमंत्रित करण्यात येवू लागले. परिणामी जास्तीत जास्त शेतकरी SRI पद्धतीवर चर्चा करू लागले व ह्या पद्धतीकडे वळायला लागले. अशाप्रकारे उत्पन्न वाढायला लागले. सन 2012-13 मध्ये प्रदान आपल्या नऊ भागीदारांसह बिहारमध्ये नऊ जिल्ह्यांत सुमारे 25000 पेक्षा जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले.

### SRI पद्धतीचा गहू पिकांवर प्रयोग

सन 2006-2009 मध्ये आम्ता कडून प्रदान संस्थेला BRLPS च्या मदतीने एक छोटीशी आर्थिक मदत मिळाली होती. गया व नालंदा जिल्हयांत आम्ही SRI पद्धतीच्या तत्वांना गहू पिकावर अंमलात आणले. त्यामध्ये जवळजवळ 278 शेतकऱ्यांचा सहभाग होता.

SRI पद्धतीने भाताच्या पिकामध्ये मिळालेले भरपूर उत्पन्न बघून शेतकऱ्यांनी गव्हामध्ये SRI पद्धतीला बऱ्यापैकी प्रतिसाद दिला. विशेषतः पेरणीच्या वेळी जास्त मजूर लागतात आणि त्याची भीती मनात असताना देखिल कमी प्रमाणात लागणारे बीज व जास्त येणारे उत्पादन या मुळे अनेक शेतकरी याकडे आकर्षित झाले. पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणावर इतर शेतकऱ्यांनी, स्थानिक सरकारी अधिकारी तसेच ICAR चे श्री. टी.विजयकुमार व संयुक्त सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, नवी दिल्ली ह्यांनी SRI पद्धतीच्या शेतावर भेटी दिल्या. ह्या भेटी दरम्यान त्यांनी तेथील बचत गटाच्या महिला शेतकऱ्यांशी चर्चा केली. त्याचप्रमाणे त्यांनी SRI व SRI पद्धतीचा अवलंब केलेल्या शेतकऱ्यांच्या यशोगाथा ऐकून त्यांच्या आनंदात सहभागी झाले. इथे भेट देणारा प्रत्येक अधिकारी ह्या पद्धतीने शेती करणाऱ्या प्रत्येक महिला शेतकऱ्यांचे प्रयत्न व त्याचे परिणाम बघून आश्चर्यचकित झाला. सन 2009-2010 वर्षाअखेर आम्ही 15000 पेक्षा जास्त SRI पध्दतीने गव्हाचे उत्पादन घेणाऱ्या शेतांची मोजणी केली.

### इतर यशस्वी प्रकल्प

सन 2008-2009 मध्ये टाटा ट्रस्टच्या आर्थिक सहयोगाने प्रदान संस्था Diversion Based Irrigation प्रकल्प राबवित होती. ह्या प्रकल्पाचाच एक छोटा भाग म्हणून आम्ही गया जिल्ह्यात SRI पद्धतीने वांगी, टमाटर, कारले, मिरचीचे प्रयोग घेतले. ह्या प्रयोगांनी सुद्धा भारतातील सर्व संशोधकांचे लक्ष वेधून घेतले. SRI भाजीपाला शेतावर हैदराबाद येथील National Institute of Rural Development चे शास्त्रज्ञ व फीलीपाईन्सहून IRRI चे शास्त्रज्ञांनी भेट दिली. गया जिल्हयांतील DRDA चे निर्देशक व इतर शासकीय अधिकाऱ्यांनी ह्या SRI भाजीपाला पद्धतीचा व DBI प्रकल्पाचा बारकाईने विचार केला व अभ्यास केला. परिणामी अशा प्रकारच्या बऱ्याच प्रकल्पांना विभागामार्फत किंवा गांवातील गटांच्या माध्यमातून राबविण्यास मान्यता दिली.

सन 2009-2010 मध्ये प्रदान ला आत्मा कडून मोहरीचे उत्पन्न वाढविण्यासाठी एक प्रयोगशील प्रकल्प राबविण्यासाठी निमंत्रित करण्यात आले. ह्या प्रयोगाचे वैशिष्ट्य हे होते की, ह्या दरम्यान वेगवेगळया विभागाच्या शास्त्रज्ञांमध्ये ज्ञानाची व माहीतीची चांगलीच देवाणघेवाण झाली. स्थानिय शासनासाठी SRI मोहरीचे वाढलेले उत्पन्न खरोखरच आश्चर्याचा विषय होता. ह्यानंतर प्रदानला गया जिल्ह्यांतील11 ब्लॉकस् मधील महिला शेतकऱ्यांसाठी SRI पद्धतीवर आधारित मोहरी पिकावर महिला शेती शाळा राबविण्यास आर्थिक सहाय्य मिळाले.

सन 2012 मध्ये आम्ही SRI पद्धतीचा वापर करून सुरणावर प्रयोग घेवून पाहिला. ह्या पिकांवर सुद्धा SRI पद्धतीचा फार चांगला परिणाम दिसून आला. बरेच शेतकरी ह्या पद्धतीकडे वळले.

इतर पिकांवर प्रयोग घेतांना असे लक्षात आले की, SRI पद्धतीचे एकच तत्व आहे की, ह्या पद्धतीत मुळांना योग्य रितीने वाढण्यास जास्तीत जास्त जागा मिळते. हळूहळू SRI पद्धती शेतकऱ्यांमध्ये खुपच लोकप्रिय झाली. स्थानिक गावांमध्ये SRI हा शब्द आदर व सौभाग्यचिन्ह म्हणून वापरण्यात येते. म्हणून बिहारमध्ये ह्या पद्धतीला सर्वत्र SRI विधी म्हणून ओळखल्या जावू लागले. ग्रामस्थांमध्ये व अगदी शासन दरबारी ही पद्धती सर्वत्र बोलण्यात येऊ लागली.

### विशेष आकर्षण

सन 2008-2009 मध्ये पटना येथे राज्यस्तरीय SRI धानासाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली. ह्या कार्यशाळेचे उद्‌घाटन बिहारच्या कृषिमंत्री डॉ. श्रीमती रेणूकुमारी कुशवाहा ह्यांच्या हस्ते करण्यांत आले. SRI शेतकऱ्यांनी विशेषतः महिलांनी केलेली प्रगती बघून त्यांना अतिशय आश्चर्य वाटले.

सन 2009 च्या पहिल्या महिन्यात बिहारच्या मुख्यमंत्र्यांनी राज्याच्या सर्व शेतकऱ्यांना किसान महापंचायतसाठी निमंत्रित केले. ह्या कार्यशाळेला 2500 पेक्षा जास्त शेतकरी उपस्थित होते. सोबतच मुख्यमंत्री श्री. नितीशकुमार व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. ह्या कार्यशाळेला गया येथील महिला शेतकरी श्रीमती भारतीदेवी यांना आपले SRI पद्धतीबद्दलचे अनुभव बोलायला निमंत्रित करण्यांत आले होते. त्यांनी एक हेक्टरमध्ये 18.1 टनाचे उत्पन्न घेतले होते. तिचे अनुभव व उत्पन्नाचा आकडा बघून मुख्यमंत्र्यांनी तिला 10 मिनीटां ऐवजी अर्धा तास बोलायला लावले व तिची प्रशंसा केली. ह्यातून उपस्थित असलेल्या शेतकऱ्यांना देखील धडे मिळाले.

ऑक्टोंबर 2009 मध्ये BRLPS नी महिला बचतगटाची ह्यापेक्षाही मोठी सभा आयोजीत केली. ह्या सभेत इतर स्टॉल्स सोबत SRI स्टॉलपण लावण्यात आले. ह्यावेळी मुख्यमंत्री सभेच्या उद्घाटनापूर्वीच प्रत्येक स्टॉलवर भेट देण्यास गेले. त्यांनी SRI  स्टॉलवर थांबून, SRI विधीवर आधारित माहीतीपत्रके पाहीली, वाचली व SRI शेतकऱ्यांशी चर्चा केली. त्यानंतर सभेच्या उद्घाटन प्रसंगीच्या भाषणात त्यांनी बचतगट शेतकऱ्यांना उद्देशून वक्तव्य केले की SRI पद्धतीचा बिहारमध्ये अवलंब केल्यास खाद्यान्नाच्या समस्येवर उपाय नक्कीच मिळेल. मोठया प्रमाणात प्रसार सन 2010-11 मध्ये कृषिमंत्री श्रीमती रेणूकुमारी कुशवाहा सोबत मुख्यमंत्र्यांनी गया जिल्ह्यांत खुशवारा येथे SRI गहू शेतावर भेट दिली. ह्या त्यांच्या भेटीमुळे व त्यांनी शेतकऱ्यांशी केलेल्या चर्चेमुळे बऱ्याच वरिष्ठ अधिकाऱ्यांचा कल ह्या SRI पद्धतीकडे वाढला. त्यांनी राज्यांत SRI पद्धतीचा जास्तीत जास्त प्रचार होण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यांत 5 शेतकऱ्यांना SRI पद्धतीसाठी आर्थिक अनुदान देण्याचे जाहीर केले. प्रत्येक विभागात SRI पद्धतीवर प्रशिक्षण आयोजीत करण्यास सरकारने PRADAN ला निमंत्रित केले. त्यानंतर आम्ही काही महिला शेतकऱ्यांच्या मार्फत सरकारी अधिकाऱ्यांना व शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली. 2009 व 2010 मधल्या दूष्काळानंतरही शेतकऱ्यांची आमच्या कार्याती आवड कायम होती.

ह्या कार्यात राज्यशासनाचा चांगलाच पाठिंबा मिळाला. ह्यापुढेही जावून राज्यसरकारने 2011 वर्ष हे केवळ SRI वर्ष म्हणूनच नाही तर त्यास SRI क्रांती असे घोषीत केले.

SRI क्रांती वर्ष साजरे करण्यासाठी आम्ही काही प्रचार-प्रसार सामुग्री, माहितीपत्रके तयार केली. सरकारी प्रतिनिधींनी देखील काही छापील माहीतीपत्रके तयार केले. 1 जानेवारी 2011 ला पाटना येथील एस के. मेमोरियल सभागृहात विशेष सभेचे आयोजन करून मुख्यमंत्र्यांनी SRI क्रांती वर्षाची सुरुवात केली.

ह्यावेळीच्या त्यांच्या भाषणामध्ये त्यांनी सुमारे 2600 अधिकारी व शेतकऱ्यांसमोर येत्या वर्षात 350000 हेक्टर जमीन SRI धान पद्धतीखाली आणण्याचा निर्धार व्यक्त केला. डॉ. आर.के. सोहाने, बिहारचे कृषिप्रचार प्रबंधक व प्रशिक्षण केंद्राचे भुतपूर्व निर्देशक ह्यांनी प्रत्येक विभागात व बिहारच्या प्रत्येक जिल्ह्यात ह्या पद्धतीवर प्रशिक्षण कार्यशाळेची साखळीच निर्माण केली. प्रसार माध्यमांनी देखील ह्या पद्धतीच्या प्रसारात चांगलीच भुमिका बजावली. श्री. जयजीतकुमार, भारतीदेवी व सुनिता देवी सारख्या शेतकऱ्यांनी आपल्या अनुभवांची चर्चा पाटणा येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत केली. एका गावातून दोन महिला शेतकरी व दुसऱ्या गांवातील एक पुरूष शेतकरी ह्यांनी बिहार मध्ये 38 जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिले.

ह्या सर्व प्रयत्नांचे परिणाम खूपच आश्चर्यकारक व छान होते. सन 2011-12 वर्षातील राज्य सरकारच्या अहवालात राज्यातील SRI भाताखाली असलेल्या 335000 हेक्टर जमीनीची नोंद झाली होती. त्यामध्ये सुमारे 26000 शेतकरी कुटुंबाचा समावेश होता. ह्यावर्षी बिहारमध्ये धानाचे उत्पन्न 7.2 दशलक्ष टनाच्या वर पोहोचले होते, जे की मागील वर्षात फक्त 4.2 दशलक्ष टन होते. ह्या वाढलेल्या उत्पन्नात SRI धानाचा जास्तीत जास्त वाटा होता. (प्रति हेक्टरी 7 टन) नालंदा जिल्ह्यांतील दुर्वेस्वुरा गावातील एका शेतकऱ्याने 22.4 टन/हेक्टरी असे धानाचे उत्पादन घेतले. ह्या शेतकऱ्याला 15 जानेवारी 2013 मध्ये राष्ट्रपतीच्या हस्ते कृषिकरमान पारितोषिक देवून गौरव करण्यात आला. त्यासोबतच बिहारची उत्पादन पातळी वाढण्यासाठी कृषिमंत्र्यांचा देखील गौरव करण्यात आला.

अशा बऱ्याच गौरवास्पद घटना बिहारमध्ये घडत आहेत, ज्याचा आम्हाला अभिमान आहे.

***श्री अनिलकुमार वर्मा***

*प्रिझर्वेशन ॲण्ड प्रॉलीफरेशन ऑफ*

*रुरल रिसोर्सेस ॲण्ड नेचर (PRAN)*

*प्रदान रोड नं.6, इस्ट शास्त्रीनगर, गया-823001, बिहार.*

*E-mail : gaya@pradan.net*

***मराठी अनुवाद : डॉ. सरिता मोवाडे***

***मूळ लेख : SRI Kranti : The Rice revolution ( Vol. 15, No. 1 March, 2013)***



*कांदा काढणी व पॅकींग*

# शेतकरी उत्पादक संस्था

## ग्राहक विक्री मुल्यामध्ये शेतकऱ्यांचा वाटा वाढविण्यासाठीचा यशस्वी प्रयत्न

**मुळ लेखकः पी.नंदीशा, आर. संजीव व आर.एस.एस. होपर**

**मुत्तलुरचे शेतकरी एकत्र येऊन शेतकरी उत्पादक संस्था (FPO) स्थापन करून शेतमालाच्या ग्राहक विक्रीमुल्यात जास्तीत जास्त वाटा मिळवीत आहेत. उत्पादक संस्था स्थापन केल्यामुळे शेतकऱ्यांची व्यापारी व दलाल यांच्यामार्फत होणारी लूट तर थांबलीच, परंतु नविन बाजारपेठा, वेळेवर पतपुरवठा व उत्कृष्ठ कृषि निविष्ठा उपलब्ध झाल्या. हे सर्व शेतकऱ्यांच्या सामुहिक व संघटीत प्रयत्नांमुळे शक्य झाले आहे.**

करानुसार सुक्ष्म पाणलोट क्षेत्रातील बहुतांश शेतकरी हे भुमीहिन किंवा सीमांतर व लहान शेतकरी आहेत. जवळपास 500 हेक्टरचे हे सुक्ष्म पाणलोट क्षेत्र तामिळनाडू राज्यातील विळूपूरम जिल्ह्यातील वानुर तालुक्याच्या नल्लावून उपपाणलोट क्षेत्रामध्ये येते. या भागात पावसाचे प्रमाण सुमारे 1200 मि.मि असून जिल्ह्यामध्ये सरासरी पेक्षा थोडे कमी आहे.

या पट्टयातील माती रेताळ गाळाची व चिकट गाळाची या प्रकारची असून जवळपास 10 टक्के जमीन ही चोपन आहे. हवामानातील विविध घटकांमुळे या भागातील शेती ही आर्थिकदृष्ट्या फायद्याची नसल्यामुळे अन्नधान्य उत्पादन व उत्पन्न याची शाश्वती नव्हती. या सर्व बाबी तेथील शेतकऱ्यांच्या अस्थिर जीवनमानाला कारणीभूत होत्या.

करासनुर व त्यालगतच्या परिसरामध्ये भात व कांदा ही मुख्य पिके होती. या भागातील शेतकऱ्यांची जमिनधारणा 2 ते 3 एकर असून अंदाजे 250 एकर क्षेत्रावर कांदा लागवड केल्या जाते. हे शेतकरी कांद्याच्या मुत्तलूर ह्या स्थानिक वाणाची लागवड करतात. ह्या वाणाच्या विशिष्ट उग्रतेमुळे ह्या वाणाला निर्यातीसाठी व स्थानिक बाजारपेठेत चांगलीच मागणी असते. कांद्याच्या ह्या वाणाला 2 ते 4 फूटवे असून ह्याचा साठवण कालावधी हा अंदाजे 15 दिवसांचा आहे. ह्या वाणाचे बियाणे तामिळनाडू जिल्ह्यातील कुड्डालोर जिल्ह्यांतून उपलब्ध होते.

शेतकरी कांद्याची काढणी झाल्याबरोबर, कांदे लगेचच व्यापाऱ्यांना विकत होते. कारण जास्त कालावधीपर्यंत साठवून ठेवल्याने कांद्याच्या वजनात 30 टक्के घट येत होती. गावातच विक्री केल्यामुळे शेतकऱ्यांना विक्रीचा पैसा लगेचच उपलब्ध होत होता. कांद्याचा उत्पादन खर्च हा अंदाजे रूपये 27,383/- प्रती एकर असून त्यामध्ये जवळपास 68 टक्के मजूरीवर खर्च होतात. कांद्याचे सरासरी उत्पादन 44 क्विंटल प्रती एकर आल्यास, शेतकऱ्यांना रू.44,000/- उत्पन्न मिळत होते.


व्यापारी शेतकऱ्यांकडून घेतलेल्या मालाची चिल्लर किंवा घाऊक विक्री करून जास्त पैसा कमवत होते. काही व्यापारी कांद्याला वाळवून, प्रतवारी व साठवणुकीद्वारे जास्त नफा मिळवत होते. काही व्यापारी कांद्याच्या

निर्यातीसाठी चांगला व गुणवत्तापूर्वक माल खरेदी करून मलेशिया, सिंगापूर इत्यादी ठिकाणी निर्यातकाला विकत होते.

कांद्याच्या उत्पादनामध्ये ह्या शेतकऱ्यांची जवळपास 74.7 टक्के गुंतवणूक लागत होती. तसेच व्यापारी, घाऊक विक्रेते व किरकोळ विक्रेते ह्यांचा गुंतवणूक खर्च अनुक्रमे 6.42 %, 15.12%, व 3.75% होता. नफ्याचा विचार केल्यास व्यापारी 18.8% घाऊक विक्रेता 42.76% व चिल्लर विक्रेता 21.63% कमवित होते. परंतू शेतकऱ्याला मात्र फक्त 17.43% नफा मिळत होता. म्हणजेच कांदा उत्पादनात घाऊक व चिल्लर विक्रेते कमी जोखमीमध्ये व गुंतवणूकीमध्ये जास्त नफा कमवित होते. परंतु शेतकऱ्यांना मात्र जास्त जोखीम घेऊन जास्त खर्च करून कमी नफा मिळत होता.

**हवामानाला पुरक शेती पद्धतीचा अवलंब**

एम.एस. स्वामीनाथन रिसर्च फाऊंडेशन, चेन्नई या संस्थेद्वारे 2007 मध्ये 'समुहाद्वारे', 'नैसर्गिक संसाधनाचा समतोल वापर व जीवनमान उंचावण्यासाठी जैव- औद्योगिक पाणलोट क्षेत्र विकास' (Community managed Bio-Industrial water shades for sustainable used of natural resources and enhanced livelihood) हा प्रकल्प करासनुर पाणलोट क्षेत्रासोबतच भारतातील चार राज्यातील पाच कृषी हवामान विभागातील क्षेत्रांवर राबविण्यात आला. संस्थेने या प्रकल्पाअंतर्गत शेतकऱ्यांच्या शेती शाळेद्वारे प्रत्येक गावात शेतकरी उद्योग




*स्रोत -ए.एल.सी.आय. चा बी.आय.डब्ल्यु. एस. अहवाल.*

समुह (FBG : Farmer's Business Groups) शेतकऱ्यांना सुक्ष्म पतपुरवठा व इतर सुविधा उपलब्ध व्हाव्या या उद्देशाने स्थापन करण्यात आले.

शेतकरी उद्योग समुहाच्या सदस्यांच्या बैठकीत शेतीच्या विशेषतः कांदा लागवडीसाठी येणाऱ्या विविध समस्यांचे जसे निकृष्ठ बियाणे, लागवडीच्या वेळेतील अनियमितता, अपूरा व अनियमित पाऊस, किड व रोगांचा प्रादुर्भाव व उत्पादीत मालाला मिळत असलेला अत्यल्प भाव इत्यादींवर चर्चा करून त्याचे विश्लेषण करण्यात आले. वरील समस्यांचे निराकरण करण्यासाठी चरणबद्ध उपाययोजना तयार केल्या गेल्या. ह्या सर्व उपाययोजना सर्व समुहाला मान्य, पर्यावरणाला पुरक तसेच आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे की नाही याची संपूर्ण खातरजमा करण्यात आली.

शेतकऱ्यांच्या शेती शाळेत, शेतकरी उद्योग समुहाच्या बैठकीत ठरविण्यात आलेल्या लागवडपूर्व (Presowing), पिक उत्पादन (Crop-production) व (Post Harvest) तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. ह्या तंत्रज्ञानाच्या वापरातून मिळालेला फायदा व निरिक्षणे यांच्या नोंदी घेण्यात आल्या. शिवार फेरींमध्ये ह्या तंत्रज्ञानाची माहिती प्रात्यक्षिक कार्यक्रमात प्रशिक्षित शेतकऱ्यांद्वारे समुहातील इतर शेतकऱ्यांना देऊन त्यांना प्रशिक्षित करण्यांत आले.

शेतकऱ्यांच्या उद्योग समुहांनी अनेक हवामान पुरक शेती तंत्रज्ञान अवलंबून कांद्याची लागवड केली. यामध्ये उच्च प्रतीचे बियाणे, माती परिक्षणाद्वारे ठरविलेले आवश्यक भुसुधारके, सरी वरंभा पद्धती, प्रती एकरी रोपांची संख्या (88000 प्रती एकर), दोन ओळीतील अंतर 45 सें.मी., रोपातील अंतर 10 सें.मी., अतिरिक्त पाण्याचा निचरा, एकात्मिक कीड व रोग नियंत्रण इत्यादी बाबींचा अवलंब करून लवकर व एकाच वेळेस कांद्याची लागवड करण्यास प्राधान्य देण्यांत आले. लवकर लागवडीमुळे पावसाळयापुर्वी कांद्याची काढणी करणे शक्य झाले.

गावात असलेल्या हवामान केंद्राच्या हवामान बाबतच्या सूचना या गावातील माहिती केंद्राद्वारे (VKC : Village Knowledge Centre) द्वारे शेतकऱ्यांना वेळोवेळी देण्यात आल्या. गांवातील हवामान जोखीम प्रबंधकाद्वारे शेतकऱ्यांना हवामानात होणाऱ्या बदलांचे पिकांवर होणारे परिणाम व घ्यावयाची काळजी यांचे प्रशिक्षण देण्यात आले.

*व्यापाऱ्यासोबत चर्चा करतांना शेतकरी*



पुदूचेरीतील पिल्लीयारकुप्पम गावातील ग्रामसंसाधन केंद्र (VKC : Village Knowledge Centre) हे नल्लाहूर गावातील ग्राममाहिती केंद्राशी VKC संलग्न असून, ग्राममाहिती केंद्रासाठी जागा, वीज व एका कर्मचाऱ्याचे वेतन हे ग्रामपंचायतीद्वारे देण्यांत येते. दहा पावलोट क्षेत्रातील असलेल्या गावातील शेतकरी व महिला या दररोज VKC ला भेट देऊन दैनिक हवामानाचा अंदाज, पिक उत्पादनात येणाऱ्या समस्या, शासनाच्या विविध योजना, नविन तंत्रज्ञान व बाजारपेठ इत्यादी विषयी माहिती घेतात. या प्रकल्पातील सर्व शेतकरी दर पंधरवाड्यात ग्रामसंसाधन केंद्राशी VKC मोबाईलद्वारे एस.एम.एस. किंवा आवाजी एस.एम.एस. द्वारे संपर्कात राहून, शेती शाळेत (FFS : Farmer's Field School) मध्ये पिकांच्या लागवडीसंबंधी आवश्यक सूचना व माहिती प्राप्त करतात. दर महिन्यात एकदा फोनद्वारे विशेषज्ञांशी संपर्क करून पिकांच्या उत्पादनाबाबत माहिती घेतात.

या प्रकल्पामुळे 2008 मध्ये कांदा उत्पादन घेणाऱ्या सदस्य शेतकऱ्यांची संख्या 23 वरून वाढून 400 पेक्षा जास्त झाली व कांद्याचे उत्पादन 2.5 टन/एकरी वरून 4 टन/एकरी पर्यंत वाढले. काही शेतकऱ्यांनी तर 5.5 टन/एकर पर्यंत उत्पन्न घेतले. या पाणलोट समुहाने स्वामीनाथन फाऊंडेशनच्या मार्गदर्शनाखाली जलसंवर्धन व सिंचनाचा शास्त्रोक्त वापर, पर्यावरण आणि हवामान पुरक पीक पद्धती आणि सामहिक कृतीद्वारे उत्पादन व अन्नसुरक्षा प्राप्त करता येते हे सिद्ध केले आहे. हे शेतकरी कांद्याच्या विक्रीमध्ये नविन बाजारपेठेचा शोध घेऊन, मध्यस्थ व व्यापाऱ्यांद्वारे होणारी लूट थांबवून वेळेवर पतपुरवठा व चांगल्या प्रतीचे बियाणे मिळवून उत्पादीत मालाच्या विक्रीत जास्त वाटा मिळवू लागले आहेत.

**शेतकरी उत्पादक संघाद्वारे एकत्रित विक्री व्यवस्थापन**

2009 मध्ये सर्व उद्योग समुह मिळून 'नल्लावूर' शेतकरी उत्पादक संघ स्थापन करण्यात आला. या संघामध्ये अंदाजे 25 शेतकरी उद्योग समुहाचे 400 च्या वर सभासद शेतकरी असून ते कांदा व धान लागवड करीत आहे. या संघाचे कार्य स्वामीनाथन फाऊंडेशन व शेतकरी उद्योग समुहाच्या सदस्यांद्वारे सामुहीकरित्या संचालीत केले जाते. स्वामीनाथन फाऊंडेशन हे माहिती व तंत्रज्ञान पुरविण्याचे कार्य सांभाळत आहेत. शेतकरी उत्पादक संघाची कार्यकारी समिती मासिक बैठका, विविध कृषी निविष्ठांची खरेदी, उत्पादीत मालाची विक्री, आर्थिक नियोजन व संचालनाचे काम करते. शेतकरी उत्पादक संघातील सदस्यांच्या इतर संघाला दिलेल्या अभ्यासपूर्व भेटीमूळे शेतकऱ्यांना संघाचे कार्य चांगल्या पद्धतीने चालविणे शक्य झाले. शेतकऱ्यांना शेतकरी उत्पादक संघ म्हणून एकत्रित झाल्यामुळे पिकांच्या हंगामाचे नियोजन एकत्रित कृषी निविष्ठा खरेदी तसेच कर्जाची परतफेड सामुहीकरीत्या करणे शक्य झाले.



शेतमालाच्या विक्री व्यवस्थेसाठी व व्यापाऱ्यांशी विक्री व्यवहार करण्यासाठी 2011 मध्ये विपणण समितीची (Marketing Committee) स्थापना करण्यात आली. या समितीद्वारे कांद्याच्या बाजारभावाची नजिकच्या व चेन्नई येथील बाजारपेठां मधील अद्यावत माहिती ग्राम माहिती केंद्रात (VKC) शेतकऱ्यांना उपलब्ध होत होती. कांदा विक्रीसाठी अनेक शेतकऱ्यांनी स्थानीक व्यापाऱ्याशी दीर्घ मुदतीच्या करार केल्यामूळे त्यांना या प्रक्रियेत आणणे एक प्रकारचे आव्हान होते. शेतकरी उत्पादक संघामुळे वैध व्यापार पद्धतीचा अवलंब होवून मालाला चांगली किंमत, अचूक वजन व इतर सुविधा मिळू लागल्या. संघाला कांद्याच्या एका बॅगला 1200 रू. निर्यात मुल्यावर चेन्नईला भाव मिळाला व स्थानीक बाजारपेठेत 850 रू.प्रती गोणी हा भाव मागणे शक्य झाले. 2012 मध्ये आजूबाजूच्या गांवातील शेतकरी उत्पादक संघ FPO एकत्रित येवून शेतकऱ्यांनी कांद्याचे उत्पादन हे चेन्नईला निर्यातीसाठी पाठविले व त्यामुळे शेतकऱ्यांना स्थानीक बाजारपेठेतील 900 रू. प्रती गोणी ह्या भावाऐवजी 1700 रू. प्रती गोणी हा भाव मिळणे शक्य झाले. यामुळे शेतकऱ्यांचा उत्साह वाढवून संघाच्या कार्यपद्धती मध्ये संघटीतपणे काम करण्याची प्रेरणा मिळाली. शेतकरी उत्पादक संघानी भविष्यामध्ये मालाची प्रतवारी, वाळवणे तसेच शास्त्रशुद्ध साठवणूकीद्वारे शेतमालाची गुणवत्ता मुल्यवर्धन करून त्याद्वारे चांगली किंमत मिळविण्याची योजना आखली आहे.

**आभार**

नल्लावूर पाणलोट समितीचे त्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल व कायापालट प्रक्रियेसाठी दिलेल्या योगदानाबद्दल आभारी आहोत. तसेच जमशेदजी टाटा ट्रस्ट, मुंबई ह्यांचे त्यांनी दिलेल्या आर्थिक सहकार्याबद्दल कृतज्ञता आभारी आहोत. कार्यकारी संचालक एम.एस. स्वामीनाथन रिसर्च फाऊंडेशन यांनी दिलेल्या संपूर्ण मार्गदर्शनासाठी आभारी आहोत.

***पी. नंदीशा,*** *प्रकल्प समन्वयक*
*बायोइंडस्ट्रीयल वॉटरशेड प्रोजेक्ट (जैव औद्योगिक पाणलोट प्रकल्प)*
*विलूप्पुरम. एम.एस. स्वामिनाथन रिसर्च फाऊंडेशन, 3री गल्ली,*
*तारामणी इन्स्टीट्युशनल एरिया, चेन्नई.*
*Email : nandishcp@gmail.com*

***मराठी अनुवादः लक्ष्मीकांत पडोळे***

***मूळ लेख :*** ***Farmer producer organisation : Enhancing farmers share in the consumer price ( Vol. 15, No.3 June 2013)***



*वनस्पती पासून बनवलेले मिश्रण शेतकरी वापरतात.*

# लहान शेतकरी - मोठा बदल

मूळ लेखक : झकिर हुशेन, जी.व्ही. रामंजेनेयुलु, जी.राजशेखर व जी.चंद्रशेखर

**कृषि जैव विविधतेला प्रोत्साहन देण्याच्या हेतूने ज्ञानवाढ करणे, प्रयोग करणे व त्याचा इतरांपर्यंत प्रचार/प्रसार करणे अशा स्वरूपाचा कार्यक्रम, ऑक्सफाम नोबिव व हिंवास यांनी 'कृषि जैव विविधता ज्ञान वृद्धी कार्यक्रम' (अॅग्रीकल्चर बायो-डायव्हर्सिटी नॉलेज प्रोग्रॅम) या नावाने सुरू केला आहे. प्रचिलित- महागडया रासायनिक कृषि निवीष्ठांच्या आधारावर उभ्या असलेल्या कृषिपद्धतीमध्ये आमुलाग्र बदल घडवून जैव विविधतेवर आधारित कृषिप्रणाली निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा हेतू आहे. प्रत्यक्ष शेतकऱ्यांचा फायदा, निसर्गाची जोपासना, पुरेशा व सकस आहाराची खात्री, शेतकरी व त्यांच्या उपजत ज्ञानाचा, त्यांच्या निवडीचा आदर या सर्व बाबी या कार्यक्रमाचे प्रमुख भाग आहेत. 'कुटुंबासाठी शेती व शेतीसाठी कुटूंब' या अवस्थेत असणाऱ्या लहान शेतकऱ्यांनी अनेक वर्षांपासून करीत असलेल्या रासायनिक शेती पद्धतीमध्ये बदल घडवून आणलेल्या यशस्वी प्रयोगांची व अनुभवांची मांडणी भारतातील आंध्रप्रदेश मधील 'सेंटर फॉर सस्टेनेबल अॅग्रीकल्चर' या संस्थेमार्फत या लेखात केली आहे.**

आंध्रप्रदेशमध्ये लहान शेतकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. 'कुटुंबासाठी शेती व शेतीसाठी कुटुंब' अशी या शेतकऱ्यांची अवस्था आहे आणि खूप समस्यांना त्यांना तोंड द्यावे लागत आहे. गेल्या 18 वर्षांच्या कालावधी मध्ये सुमारे 35000 पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यापैकी बहुतेकांनी अत्यंत महागड्या, बाजारू कृषिनिविष्ठांचा वापर करण्यासाठी झालेल्या कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केल्याचे आढळते. पिकावर विविध किडींचा प्रादूर्भाव/रोग पडणे हा तर स्थायी भाव आहे. हे सर्वांनाच मान्य आहे. परंतू सेंटर फॉर सस्टेनेबल अॅग्रीकल्चर (सी.एस.अे.) या संस्थेच्या हे लक्षात आले की 'कीड प्रादूर्भाव' पेक्षा किटकनाशकांची फवारणी हे अनेक शेतकऱ्यांच्या जणू प्रतिष्ठेचा भाग बनला आहे. किटकनाशके खूप महागडी तर आहेतच पण शेतकरी,व त्याच्या कुटुंबाच्या आरोग्याच्या दृष्टीने घातक पण आहेत. किटकनाशकांच्या वापरामुळे पर्यावरणावर तर विपरित परिणाम होतोच. शिवाय कीड प्रादुर्भावाची समस्या पूर्णपणे सुटत नाहीच. जेवढा किटकनाशकाचा वापर आपण वाढवू तितका पर्यावरणावर विपरित परिणाम वाढतो आणि सोबत कीड प्रादुर्भावाचे वाईट परिणाम पण वाढत जातात. हा अनेक लहान शेतकऱ्यांचा अनुभव आहे. कीडीचे नियंत्रण करण्याची गरज आहे हे सर्वांनाच मान्य आहे. यावर काही शेतकरी, स्वसंसेवी संस्था, शासन यांनी मिळून उपाययोजना म्हणून 'कीटकनाशक विरहित कीड व्यवस्थापन' ही रणनिती सर्वदूर प्रसारित केली.

### किटकनाशक विरहित कीड व्यवस्थापन

एका वेगळ्या प्रकारच्या बदलाची गरज होती. कीड प्रादुर्भाव रोखण्यासाठी किटकनाशकाचा वापर थांबवणे व एकात्मिक पिकपद्धती अवलंबणे व उपलब्ध स्थानिक तंत्राचा वापर करणे ही या बदलाची पहिली पायरी होय. सी.एस.ए. अशा लहान शेतकऱ्यांना त्यांच्या पारंपारिक

ज्ञानाचा व अनुभवाचा उपयोग करून हा बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करत आहे. 'किटकनाशक विरहित कीड व्यवस्थापन' ही संकल्पना साधारणतः 1980 च्या दशकात विकसित झाली आणि वापराचे चांगले परिणाम देखील राज्यभरात अनेक ठिकाणी दिसून आले. ह्या संकल्पनेमागचे मूल तत्व हे की शेतकऱ्यांना कीडीचे जीवशास्त्र व स्वभाव नीटपणे जाणून घेण्याचे प्रशिक्षण देणे, प्रत्येक पिकाचे पर्यावरणीय व्यवस्थामधलं अस्तित्व/नातं, ह्या संदर्भात शेतकऱ्यांचे पारंपारिक ज्ञान कौशल्य अजमावणे.

लहान शेतकरी (कुटुंबासाठी शेती व शेतीसाठी कुटूंब) हे शेतातच राहतात व शेतात वाढवल्या जाणाऱ्या प्रत्येक पिकाशी आपलं जवळचं नातं विकसित करतात. अशा शेतकऱ्यांसाठी 'किटकनाशका विरहित कीड व्यवस्थापन' किंवा 'नैसर्गिक कीड व्यवस्थापन' ही अत्यंत सुलभ प्रणाली आहे. अशा शेतकऱ्यांच्या शेतातल्या पिकासोबतचं जास्त वास्तव्य पिकांच्या वाढीच्या प्रक्रियेची खोलवर समज निर्माण करण्यास मदत करते. त्याचप्रमाणे रासायनिक किटकनाशकांच्या वापरामुळे शेतकरी व त्यांच्या कुटुंबियांवर होणारे दुष्परिणाम हवेद्वारे, त्वचेद्वारे व अन्नाद्वारे त्यांना लगेच उमजत असतात.

सी.एस.ए.संस्थेने सन 2004 मध्ये कीड व्यवस्थापनाचे ज्ञान वाढविण्यासाठी 12 गावामध्ये 'शेतकरी शाळांचे' एक जाळे उभे केले. या 'शेतकरी शाळां' च्या माध्यमातून शेतकऱ्यांना एकंदर कृषि-पर्यावरण व्यवस्था समजून घेण्याची संधी मिळाली व त्या आधारे आपल्या पिकाचे नियोजन करणे सोयीचे झाले. आज 12 गावांपासून ही चळवळ 11000 गांवांपर्यंत पोहोचली आहे.

एक वेळ अशी होती जेव्हा आंध्रप्रदेशमध्ये सर्वात जास्त रासायनिक कीटकनाशकांचा वापर केला जात होता. आज भारतातील सर्वात कमी रासायनिक कीटकनाशके वापरणारे आंध्र हे राज्य आहे. ज्या गावानी रासायनिक कीटकनाशकांचा वापर वर्ज्य केला आहे त्यांनी गेल्या सहा वर्षात एकदाही कोणत्याही किडीचा मोठ्या प्रमाणावर हल्ला झाल्याचे अनुभवले नाही. त्यांच्या उत्पादन प्रमाणात देखील घट झाल्याचे दिसत नाही.

**वेगवान प्रसारासाठी अवलंबिले गेले मार्ग**

विकास प्रक्रियेमध्ये सर्वोत्कृष्ट रूढींचा वापर जास्तीत जास्त लोकांमध्ये कसा झपाट्याने वाढवायचा हा सतत व सर्वांना भेडसावणारा प्रश्न आहे. किटकनाशक वापराबद्दलचा आंध्रच्या शेतकऱ्यांमधील दृष्टीकोन बदलाची ही प्रक्रिया कदाचित याचे उत्तर देऊ शकेल. तत्वज्ञानाच्या आधारावर यशस्वी प्रयोगाची गुणवत्ता व शाश्वतता टिकवत त्याचा विस्तार झपाट्याने व विविध भागातील शेतकऱ्यांमध्ये पसरवण्याचे प्रयत्न करण्यात सी.एस.ए. ला यश लाभले आहे. गाडीचे नवीन चाक शोधण्यापेक्षा असलेले चाक शोधक दृष्टी ठेवून त्याचा पुर्नःवापर करण्याचे तत्त्व सी.एस.ए. ने अवलंबले आहे. हे न केल्याने कदाचित चांगले अनुभव असेच विखुरलेल्या अवस्थेत राहून विरून गेले असते. जसे एरवी सर्वच बाबतीत होत असते.

'यशोगाथा' वेगवेगळ्या मार्गानी सर्वदूर पोहोचवल्या जाऊ शकतात त्या आपोआप ओघानेच पसरतात. स्वयंसेवी संस्था किंवा शासन ते नियोजन योग्य पद्धतीने पोहचवू शकतात किंवा एखादी कल्पना अथवा पद्धत वाऱ्यासारखी आपोआपच तळागाळात पसरते. पण सी.एस.ए. च्या अनुभवानुसार वेगवान प्रसारासाठी क्लुप्त्या महत्वाच्या ठरल्या. एक म्हणजे इतर स्वयंसेवी संस्था व सरकारी यंत्रणा सोबतचा सहयोग आणि दुसरे म्हणजे प्रत्यक्ष शेतकऱ्यांनी स्थानिक परिस्थितीसोबत या संकल्पनेचा स्वतःहून केलेला वापर.

**शेतकरी ते शेतकरी**

आंध्रप्रदेश मधील खम्मम जिल्ह्यांतील पुनुकुला हे गाव राज्यातील हवालदिल झालेल्या सर्व लहान शेतकऱ्यांसाठी एक आशेचा किरण म्हणून सिद्ध झाले. पुनुकुला ग्रामस्थानी औपचारिकदृष्ट्या ''विनारासायनिक किटकनाशक वापराचे गाव'' असे 2003 साली प्रथम जाहिर केले. गांवातील शेतकऱ्यांनी कीड नियंत्रणाचे वेगवेगळे प्रयोग अंगीकृत केले आणि संपूर्ण क्रांतीचे प्रस्तावक बनले. अत्यंत सोपी व परवडणारी अशी कीड प्रतिबंधात्मक प्रणाली (संबंधित किडीच्या जीवनचक्राच्या अभ्यासावर आधारित) त्यांनी विकसित केली आणि हे स्थानिक तंत्रज्ञान सर्वदूर पसरवण्यात यशस्वी ठरले. या गावातील शेतकऱ्यांचे यश अनेकांनी नोंदविले. प्रसार माध्यमानी देखील याला चांगली प्रसिद्धी दिली व आंध्रप्रदेशच्या कृषिमंत्र्यांना देखील याचा प्रचार, प्रसार करण्यास प्रवृत्त केले.

या उदाहरणामध्ये, निरिक्षणाअंती राज्यसरकारनी या कृषिप्रणालीचा मोठ्या प्रमाणावर प्रचार/प्रसार करण्याचे मनावर घेतले. परंतू तरीही खालून-वर शिकून विकास पावण्याचे हे एक उत्तम उदाहरण आहे. संपूर्ण आंध्रप्रदेश राज्यांत पसरलेले हे उदाहरण एकापासून दुसऱ्याकडे, दुसऱ्यापासून तिसऱ्याकडे असे 'शेतकरी ते शेतकरी' या मार्गाने ते राज्यभर पसरले असे म्हणावे लागेल. लोक शेतातच राहून शेतातच काम करीत असल्यामुळे नविन ज्ञान एकमेकांसोबत वाटतात आणि आजूबाजूच्या समस्त शेतकऱ्यांपर्यंत ते पसरते. इतर शेतकऱ्यांची परिस्थिती व अवस्था ते समजू शकतात व त्यांना पटेल या भाषेत त्यांना समजावून सांगू शकतात.

सी.एस.ए. ने याचा फायदा घेवून ''नैसर्गिक कीड व्यवस्थापनाची'' प्रणाली वापरणाऱ्या शेतकऱ्यांनी दुसऱ्या शेतकऱ्यांना व इतर गावातील शेतकऱ्यांना शिकविण्यास संधी निर्माण करून दिली. छोट्या स्वरूपाची शेती, स्वतःहून सर्व कामे करण्याची रीत, एकमेकांच्या शेतावर सहज जाता येणे व अशा शेतकऱ्याचे एक जाळे असणे, या सर्वांमुळेच ही शेती प्रणाली आत्मसात करणे शक्य झाले. 'कुटुंबासाठी शेती व शेतीसाठी कुटुंब' ह्या संकल्पनेवर आधारित शेती करणाऱ्या सर्व शेतकऱ्यांचा आपोआपच एक गट निर्माण होत गेला.

शेकडो गावांमध्ये झपाटयाने ही कृषिप्रणाली पसरण्यामध्ये महिलांचा मोठा वाटा राहिला आहे. महिलांच्या बचतगटांमध्ये या विषयावर चर्चा झाल्या. बचतगटाच्या जाळ्यामुळे महिलांनी शेतीमध्ये येणाऱ्या समस्यांवर तोडगा काढण्याचे मनोमन ठरवले. स्वतः या संकल्पनेचा अभ्यास केला व वापर करून त्याचे चांगले परिणाम इतर बचतगटाच्या महिलांपर्यंत पोहोचवले. सी.एस.ए. तर्फे राबवल्या जाणाऱ्या या कार्यक्रमाचा शेतीकडे बघण्याचा दृष्टीकोन हा तंत्रज्ञानापेक्षा आजीविकेचा मुद्दा म्हणून जास्त आहे. महिलांना बिगर रासायनिक शेतीचे फायदे लवकर व खोलवर समजले. त्याचे आर्थिक, सामाजिक व आरोग्यविषयक फायदे त्यांनी अनुभवले. हे लोण जसजसे पसरू लागले तसे अनेक गावच्या बचतगटाच्या महिलांनी आपल्या गावात ह्याची मागणी करायला सुरुवात केली, आणि आपल्या घरच्या पुरूषांना शेतीसाठी रसायनांची गरज नसल्याचे त्यांनी पटवून दिले.

### ''नैसर्गिक कीड व्यवस्थापना'' चा प्रसार

गावागावामधून मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेली 'किटकनाशक विरहित कीड व्यवस्थापन' (नैसर्गिक कीड व्यवस्थापन) ह्याची मागणी यामुळे शासनप्रशासन स्तरावर एक दबाव निर्माण झाला. यातून 'कम्युनिटी मॅनेज्ड सस्टेनेबल ॲग्रीकल्चर' (समुहसंचालित शाश्वत शेती) नावानी याचा प्रचार प्रसार करण्याचा मोठा कार्यक्रम समोर आला.

शासनाचे सातत्याने म्हणणे असते की, किटकनाशकांचा वापर सोडून देण्यास शेतकरी तयार नसतो. परंतू ह्या 'शेतकरी ते शेतकरी' या चळवळीने हे सर्वांना दाखवून दिले की 'नैसर्गिक कीड व्यवस्थापन' कृषि प्रणालीचा मोठ्या प्रमाणावर प्रसार करता येतो. यामध्ये लहान शेतकरी चळवळीने बदलायला तयार झाले व बदलले सुद्धा. शासन बदलेल की नाही याचा विचार न करता शेतकऱ्यांनी शासनाच्या सहयोगाविना सुद्धा ह्या कृषिप्रणालीच्या मिळालेल्या फायद्याच्या अनुभवाच्या आधारे ह्या नैसर्गिक कीड नियंत्रण पद्धतीचा स्वतःहून मोठ्या प्रमाणावर अवलंब केला. योगायोगाने आंध्रप्रदेशच्या सरकारी खात्याने सी.एस.ए. च्या ह्या प्रयोगाला साथ देण्याची तयारी दाखविली.

सी.एस.ए. नी आपला अनुभव इतर स्वयंसेवी संस्थांच्या मार्फत वाढवण्याचा पहिला प्रयत्न केला. तेव्हाच खऱ्या अर्थाने याचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होण्याची सुरूवात झाली. नंतर मग आंध्रप्रदेशच्या ग्रामीण विकास खात्याने याची इतरत्र पुनरावृत्ती करण्यास मदत केली. या आपसी सहयोगाने हे दाखवून दिले की, मोठ्या प्रमाणावर एकात्मिक दारिद्र्य निर्मूलन शाश्वत पद्धतीने घडवून आणायचे असेल तर सर्व पातळीवर कृतिशिलता आणि एकोप्याची, सहयोगाची आवश्यकता असते. प्रत्येकाची उद्दिष्टे व हेतू समान असले पाहिजेत किंवा एकमेकाला समर्थन करणारे असले पाहिजेत.

सी.एस.ए. चे रासायनिक किटकनाशला पर्याय देवून त्याला सर्वांपर्यंत पोहोचवण्याचे ध्येय आणि शेतीचा लागत खर्च कमी करून लहान शेतकऱ्यांच्या उपजिवीकेमध्ये सुधार आणण्याचे ध्येय ह्यांचा कोठेतरी मिलाप झाला. दोन्ही एकमेकांस पुरक ठरले. आंध्रप्रदेशच्या या उदाहरणावर आधारीत राष्ट्रीय पातळीवर 'महिला किसान सक्षमीकरण कार्यक्रम' अनेक राज्यामध्ये राबविला जात आहे.

शासनासोबत ह्या कार्यक्रमाची अंमलबजावणी व भागीदारी शक्य झाल्यामुळे हा कार्यक्रम एका यशस्वी प्रयोगापुरता मर्यादित न राहता तो मोठ्या प्रमाणात सर्वत्र पसरला. राज्यसरकारची सोबत मिळाल्यामुळे राज्य तसेच राष्ट्रीय पातळीवर धोरणात्मक बदल घडवून आणणे देखील शक्य झाले. यामध्ये स्वयंसेवी संस्थांकडे असलेल्या विशेष प्राविण्याचा फायदा देखील राज्यसरकारला घेता आला. त्यामुळे नविन संकल्पना, नाविन्य, पर्याय या सगळयांचा सकारार्थी उपयोग शासकीय पातळीवर करण्यांत आला. वास्तविक पाहता शासकीय कार्यप्रणाली ही नियम, व्यवस्था, यंत्रणा बनवण्यातच मग्न असतात व नवे पर्याय किंवा प्रयोग आत्मसात करण्याच्या आणि जबाबदारी घेण्याच्या मानसिकतेतच नसतात. पण ह्या बाबतीत मात्र सर्वतोपरी सहयोग शासनाकडून मिळाला हे सत्य आहे. यामध्ये एक मात्र नक्की आहे की, जो अत्यंत कळीचा मुद्दा म्हणता येईल आणि तो म्हणजे अशा सहयोगामध्ये परस्परांवरचा विश्वास, आदर आणि मान्यता ह्या गोष्टी सर्वांत महत्वाच्या असतात. या बाबीमुळे आपला गैरफायदा घेतला जाण्याची भीती किंवा एखाद्याच पार्टनरचे वर्चस्व आणि नियंत्रण राहण्याची भिती एकमेकांमध्ये राहत नाही.

### परिणामकारक वाढ

शास्वतपणाची गुरूकिल्ली कोणत्याही प्रकारची कृषिप्रणाली किंवा एखादी नविन कृषिप्रणालीची उपयुक्तता ही त्या प्रणालीची किती मोठ्या प्रमाणावर पुनरावृत्ती करू शकतो त्या निकषावर तपासून पाहता येते. हजारो शेतकऱ्यांनी हे नोंदवले आहे की, नैसर्गिक पद्धतीने केलेले कीड नियंत्रण आणि जमिनीची सुपिकता याचे परिणामकारक यश त्यांना मिळाले आहे. अर्थातच ह्या पद्धतीमुळे शेतकऱ्यांचा आर्थिक फायदा झाल्याची व त्यांचा आत्मविश्वास वाढल्याची खूप उदाहरणे आपल्याला देता येतील. ज्या शेतकऱ्यांनी शेती लागत खर्च भागवण्यासाठी शेती गहान ठेवून कर्ज घेतले होते, त्यांनी ह्या कृषिप्रणालीचा अवलंब केल्यामुळे आता ते आपली शेती कर्ज भागवून पुन्हा परत आपल्या ताब्यात घेत आहेत. उपजिविकेसाठी लहान शेतकऱ्यांचे पलायन थांबून पुन्हा शेती व शेतकऱ्यांना शेती व्यवसायाला सामाजिक दर्जा प्राप्त होतांना दिसत आहे. शेवटी महिला शेतकऱ्यांनी हे सिद्ध करून दाखवले की, जेंव्हा महिलांच्या हातात सुत्र जातात तेंव्हा त्यांचा विकासाचा पाया हा शाश्वती, समानता, पर्यावरणवादी व दूरदृष्टीवर आधारित असतो.


- ***'झकिर हुसेन'*** *हे सी.एस.ए. चे कार्यक्रम व्यवस्थापक आहेत. ते आंध्रप्रदेशामधील ट्रनाका येथे असतात.*
  *email : zakir@csa-india.org*
- ***'जी.व्ही. रामंजेनेयुलु'*** *हे सी.एस.ए. चे कार्यकारी संचालक आहेत.*
  *email : ramoo@csa-india.org*
- ***जी.राजशेखेर*** *हे सी.एस.ए. च्या बीज प्रक्रियेचे नेतृत्व करतात.*
  *email : rajsekhar@csa-india.org*
- ***जी.चंद्रशेखर*** *हे सी.एस.ए. चा ज्ञानवृद्धी व्यवस्थापन विभागाचे नेतृत्व करतात.*
  *email : sekhar@csa-india.org*
- ***दत्ता पाटील*** *हे युवा रूरल असोसिएशन, नागपूर, महाराष्ट्रचे महासंचालक आहेत.*
  *email : data.gra@gmail.com*

***मराठी अनुवाद : दत्ता पाटील***



***मूळ लेख : Small-Scale Farmers : Big Change (Vol. 15, No. 4, Dec. 2013)***



*तांदूळ मेळाव्यास भेट देणारे*

# देशी तांदूळाचे पूनरागमन

**मूळ लेखकः सीमा ग. प्रसाद**

**सहजा समृध्द, सेंद्रिय शेतकऱ्यांचे एक संघटन, ज्याने एका दशका अगोदर शाश्वत शेतीच्या कल्पना, बियाणे आणि ज्ञानाच्या देवाण घेवाणाची मुहर्तमेढ रोवली. तिच्या दमदार सुरुवातीपासून आजतागायत देशी बियाण्यांचे पुनरूजीवन अभियानाद्वारे भारतीय शेती पद्धतीत नवचतैन्य निर्माण करणारी एक ताकतवर संस्था म्हणून उद्यास आली.**

तो दिवस फारच शीण आणणारा होता. तांदूळाच्या मेळाव्यामध्ये दोन दिवसाच्या सततच्या बोलण्याने आमचे आवाज बसले होते आणि बोलण्यासाठी शरीरात त्राण उरले नव्हते.

दुसरा दिवस सरते वेळी आमच्या जवळच्या तांदूळाच्या विविध वाणांचे बियाणे संपले होते. अजून एक दिवस उरला होता. बहुतांशी बियाणे खरीददार नाराज झालेले दिसत होते कारण त्याना मोकळया हाताने परतावे लागले. अगदी एखादा किलो देखिल बिज मिळाले नाही. केवळ प्रदर्शनान लावलेले 900 विविध वाणांचे फलक, त्याबद्दलचे तक्ते पोस्टर्स आणि शेतकऱ्यांना दिली जाणारी माहिती एवढ्यावरच त्यांना भागवावे लागले.

### सेंद्रिय हेच जीवन

'सहजा समृद्धा' हा सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचा संघ, धानाच्या पारंपारिक बियाणाचा प्रचार प्रसार व शेतकऱ्यांमध्ये त्याची जाणिव निर्माण करण्यासाठी अनेक मेळावे घेत आलेला आहे. ह्या चळवळीतून शाश्वत शेतीचा पुरस्कार करणारा व पारंपारिक धानाच्या बियाणांची देवाण घेवाण व वाढ करणारा एक मंच निर्माण करण्याचा प्रयत्न या संघामार्फत चालू आहे. साधारणत दहा वर्षापूर्वी सुरू झालेल्या ह्या संघामध्ये लहान, सीमांतिक शेतकरी व महिला शेतकरी तसेच बीज जपवणूक करणारे एकत्र आले आहेत. ह्या संघामध्ये 15 शेतकरी गट व 750 सेंद्रिय शेती प्रमाणपत्र असलेले शेतकरी असून ते मूलतः शाश्वत शेतीला प्रोत्साहन देत असतात. शाश्वत शेती प्रोत्साहना सोबत आमचे शेतकरी तांदूळाच्या व तांदूळ संस्कृतीच्या संवर्धनासाठी आशियातील लोक चळवळीचेच भाग बनले आणि पारंपारिक तांदूळ वाचवणे, वाढवणे त्याचे ज्ञान सर्वत्र पसरवणे ह्या भरीव कामात ते गुंतले. प्रत्यक्ष शेतावर धानाच्या विविध जाती जोपासणे सहभागी पद्धतीने पीक सुधारणा घडवून आणणे आणि सेंद्रिय धानाचे उत्पादनास प्रोत्साहन देण्यासाठी ' सहजा समृद्धा' कर्नाटक राज्यात ह्या चळवळीला पुढाकार देत आहे.

### आपला तांदूळ/धान वाचवा

कर्नाटकामध्ये सेंद्रीय तांदूळाची शेती वेग धरत आहे. बहुतेक शेतकऱ्यांना वाटते की सेंद्रीय शेती हा एक प्रचिलीत शेतीला खात्रीलायक पर्याय आहे. त्यातील बहुतांश वाणांची लागवड, त्याची उत्कृष्ट चव, खास वैशिष्टये, तग धरण्याची ताकद (जसे : अवर्षण शोषकता, रोग प्रतिकारकता, क्षार प्रतिरोधकता) आरोग्य विषयक फायदे आणि अन्नाची गुणवत्ता यामुळे दुर्गम खेड्यांमध्ये लागवड केली जाते. औषधीय तांदूळाच्या वाणांमधील करीबत्था, कलम, कारीकालवे, दोड्डाबारिया नेल्लू, कारीगजीवीली आणि सन्नाक्की ह्या काही प्रमुख प्रजाती आहेत.

परंतु अशा औषधीगूण असलेल्या पारपांरिक प्रजातीच्या तांदूळाला बाजारपेठ मिळवणे हे एक आव्हानच आहे. विशेतः शहरी भागातील लोक अशा तांदूळाचा आकार, रंग ह्याकडे खास आकर्षित होत नाहीत. बाजारात अशा तांदुळाची मागणी नसल्यामुळे शेतकरी देखील अशा पारंपारिक वाणाचे पीक घेत नाहीत.

### सहाजा ऑरगॅनिक्स शेतकऱ्यांच्या मालकीची कंपनी

सहजा समृध्दने 'सहजा ऑरगॅनिक्स' या व्यापारी नावाखाली उत्पादक - उपभोक्ता यांची संकलन व विपणन करणारी साखळी/शृंखला निर्माण केली आहे. सहजा समृध्द ऑरगॅनिक प्रोड्युसर कंपनी (मर्यादीत) ची स्थापना सेंद्रीय माल विकण्याकरीता झाली. ही कंपनी थेट शेतकऱ्यांकडून धान्य जमा करून साखळीतल्या विक्रीकेंद्राकडे पाठविते. हि साखळी माल थेट उपभोक्त्यांकडे पोहचविण्यासाठी आणि शेतकऱ्यांना रास्त बाजारभाव मिळण्यासाठी तयार केली आहे.

सहजा ऑर्गनिक्स विविध प्रकारच्या उत्पादनांचे विपणन करते, ज्यात 30 तांदूळाचे वाण, 15 विविध दुय्यम तृण धान्य, गहू, कडधान्य, फळे आणि भाजीपाला, बालकांचे अन्न, प्रक्रीयांकरीत उत्पादन जसे : पापड, अरोग्यदायी पेय, मिश्र धान्याचे पीठ, मूल्य वर्धक उत्पादने आणि खाण्याचे अन्न पदार्थांचा समावेश होतो. विशेषत : दुय्यम तृण धान्य व लाल तांदूळाच्या अशा पिकांना पोषक तत्व आणि आरोग्यदायी उपयूक्तंता यामुळे शहरी भागात प्रचंड मागणी आहे.

सध्या कंपनीकडे 786 राज्यातील विविध प्रदेशातील सेंद्रीय उत्पादन असून 2000 पेक्षा अधिक 'सेंद्रीय रूपांतर स्थितीत' आहे. हे शेतकरी दक्षिण भारतातील मोठया शहरांतील 26 विक्री केंद्राना नियमीत माल पुरवित आहे.

ह्या जैव- उपक्रमाच्या सफलतेचे कारण म्हणजे शहरी समजाचा सहभाग होय. दक्षिण भारतातील मृत शेती संस्कृतीला संजीवनी/ नवचैतन्य देण्याकरीता शेतकऱ्यांचा गट, महिलांचा गट आणि उपभोक्तांचा गट समान विचार -धाराने एकत्रीतपणे/ एकजुटीने काम करीत आहे.



*धानाची देशी प्रजाती*

म्हणून आम्ही विविध प्रकारच्या तांदूळाची विक्री करण्याचे काम हाती घेतले. ह्या सर्व वाणाचे गुणधर्म जाणून घेण्याचा प्रयत्न केला. तसेच प्रयोग शाळामधून शास्त्रिय पद्धतीने देखिल त्यांचे गूणधर्म तपासून पाहिले. ह्या अहवालातून हे सिद्ध झाले की बाजारातील प्रसिद्ध, चमकदार तांदुळाच्या वाणापेक्षा पारंपारिक वाणामध्ये अधिक पोषणतत्व आणि आरोग्यास लाभदायक गूणतत्त्व आहेत. आम्ही पोस्टर्स, माहिती पत्रिका व विविध लेखांद्वारे या निष्कर्षांचा मोठ्या प्रमाणावर प्रसार, प्रचार केला. प्रसारा माध्यमांनी देखिल या विषयाला चांगलेच उचलून धरले. मेळाव्याच्या माध्यमातून हा विषय सर्वदूर गेला आणि अनेक लोक पारंपारिक तांदुळाकडे वळले.

### तांदूळ/धान मेळावा बदलाचा अग्रदूत!

असा पारंपारिक तांदूळ आपल्या आहारात आल्याने त्याचे आरोग्य व सकस आहार विषय काय फायदे आहेत. त्याचा सुवास व इतर गुणधर्म काय आहेत ह्याची लोकांमध्ये जागृती करण्यासाठी विविध विभागांमध्ये आम्ही तांदूळ महोत्सव आयोजित केले. आम्ही बंगरूळ आणि इतर शहरांमध्ये सेंद्रीय मेळावा, देशी तांदूळ मेळावा, लाल तांदूळ मेळावा, जैवविविधता मेळावा आणि सुरक्षित अन्न मेळावा यासारख्या विविध संकल्पनेवर आधारीत मेळावे आयोजित केले. विविध तांदूळाच्या वाणांपासून चविष्ट पकवान तयार करून आकर्षक पद्धतीने प्रदर्शित केले गेलेत. तसेच मेळाव्या दरम्यान चवीसाठी पदार्थ वितरीत केलेत. यामार्फत बाजारातून लूप्त झालेल्या आरोग्यदायक, पोषक आणि विस्मरित अन्नधान्याचे पुन्हा एकदा बाजारात स्थान निर्माण केले.

सर्वसाधारण प्रत्येक मेळाव्यामध्ये 4000 ते 5000 उपभोक्ते आकर्षित झालेत. त्यात जवळपास तीन ते चार लाख रूपयांच्या पांरपारीक तांदूळ वाणांची विक्री झाली. 2012 साली पारंपारीक तांदूळ वाणांच्या वार्षिक विक्रीने 100 टनाहून अधिकचा उच्चांक देखिल नोंदविला.

मेळावा आणि त्यातील उत्पादनांची जाहिरात जनमानसात पोहवविण्यामध्ये प्रसारमाध्यमांनी प्रमुख भूमिका निभावली. विविध वृत्तपत्रे आणि मासिकांनी लाल आणि सेंद्रीय तांदूळामूळे होणाऱ्या आरोग्यविषयक बातम्या प्रसारीत केल्यात. आम्ही भेट देणाऱ्या अभ्यगतांची माहीती जमा करून पुढील संबंध दृढ काव्य करीता वापरतो.

साधारणतः 30 संस्था संघटनाना एकत्र घेवून सहजा समृद्धाने सुरू केलेला ह्या चळवळी मध्ये आज 2000 तांदूळ उत्पादक, तांदूळ सरंक्षण, शेतकरी पैदासकार इ. सामील झाले आहेत. हे सर्वजण मिळून सुवासिक, औषधी, खोल पाण्यात तग धरणारी, क्षार प्रतिरोधक आणि कोरडवाहू शेतीमध्ये येणाऱ्या अशा सुमारे 600 विविध वाणांचे संरक्षण व वाढ करीत आहेत. ही तर एक सुरुवात आहे. आमचे मुख्य ध्येय अधिकाधिक जनतेमध्ये सेंद्रीय अन्न आणि स्थानिक धान्याचा आहारात वापर जास्त पटीने वाढविणे होय. जगभरात पारंपारिक अन्नधान्यांकडे कल वाढत आहे. आणि आम्हीसुद्धा तसा बदल आमच्या राज्यात घडवून आणण्यासाठी काम करीत राहू.

***सीमा ग. प्रसाद***
*राज्य समन्वयक,*
*आपला तांदूळ वाचवा अभियान -कर्नाटक*
*क्र.7, दुसरा चौक, 7 वा मुख्य रस्ता, सुलथान प्लाया,*
*बंगरूळ-560 032*

***मराठी अनुवादः डॉ विनोद खडसे***

***मूळ लेख : Return of the Desi Rice (Vol. 15, No. 2, June 2013)***

# बदलाच्या लाटेत टिकाव- मेंढेपाळाची द्विधावस्ता

मूळ लेखकः नित्या सांबामुर्ती घोटगे



*पारंपारिक स्थलांतर करणाऱ्या धनगर समाज*

**सेलफोन व इंटरनेट सारख्या साधनानी सध्याच्या माहितीच्या जगात बळकावलेली जागा पुन्हा पारंपारिक ज्ञानाला काबीज करता येणे कठीण आहे. बदलाच्या वाऱ्याची गती लक्षात घेता हे एक मोठे आव्हानच आहे. तुटपंजी शेती आणि गुराढोरांचा सांभाळ याच्यावर या बदलाचे प्रचंड विपरित परिणाम झालेले दिसतात. किंबहुना ह्या बदलाच्या गतीला सामोरे जाण्याची कुवत नसल्याकारणाने ते जणू संपुष्टातच येत आहेत. सद्याच्या विस्तार व शिक्षणासाठी अस्तित्वात असलेल्या व्यवस्थांमध्ये अमुलाग्र बदल घडवणे हा एकमेव मार्ग अशा लहान शेतकऱ्यांना व मेंढपाळांना बदलाच्या सुसाट वाऱ्यासोबत तग धरून राहण्याची ताकत देऊ शकतो.**

खंडु कोळपे मेंढया पाळणे हे वडीलांकडुन शिकला. छोटे कोकरू जन्मल्यानंतर त्याची आई जी काळजी घ्यायची ते तो बघुन शिकला. आपले काका-काकु, आजी-आजोबा यांचे निरीक्षण करून व त्यांना मदत करता-करता खंडु शिकला. उन्हाळयामध्ये शेतक-यांच्या शेतामध्ये मेंढया चारत असतांना शेतक-यांकडुन वेगवेगळया वनस्पती विषयी खंडु शिकला. हे सर्व टिव्ही, फोन, प्रचार प्रसार, सामाजिक कार्यकर्त्यांची फळी या पुर्वीची परिस्थीती होती. खंडु कोळपेला लिहता, वाचता येत नाही.त्याला जे सर्व माहीती आहे ते तो आपल्या स्मरणात ठेवतो. खंडु हा धनगर असुन भारतातील महाराष्ट्र राज्यामधील पलायन ग्रस्त मेंढपाळ या समुदायामधील एक. आजपर्यंत भारतामध्ये बहुतेक मेंढीपालन हे वडीलोपार्जीत, स्थलांतरीत, पारंपारीक पध्दतीने जिवनाधार म्हणुन होत आहे. कित्येक शेकडो वर्षापासुन त्यांचा समुदाय मेंढीपालन करीत होता. समुदाया मधील सामुहीक ज्ञान हे, त्यांच्या दैनंदीन पध्दती जसे-गाणी, नृत्य,कथा यां माध्यमातुन जिवंत राहत. खास रात्री गावांमधील वडीलधारी मंडळी कडुंन खुल्या वर्गामध्ये हजारो चांदण्या व हस-या चंद्राच्या साक्षीने ते शिकायचे. या सर्व ज्ञानाचे अनुभवाचे दस्ताऐवजीकरण करण्याकरीता तेथे कुठल्याही प्रकारची पुस्तके, रेकॉर्ड किंवा कागद नव्हती. परंतु ज्ञान हे एका पिढी कडुन दुस-या पिढीकडे सातत्याने जात होते. ते केवळ कित्येक वर्षाच्या दैनंदीन सवयी, कृती व निरीक्षणाने. हे त्यांच्या संस्कृतीमध्येच रूजुन गेले होते. त्यांच्या मेंढीपालनामध्ये, घोंगडी मध्ये, गवताळ चराईराणांमध्ये, सवयीचा भाग होऊन बसले होते.

खंडु नी आपल्या मुलांना शाळेमध्ये टाकले. खंडुचा मोठा मुलगा हा चांगला हुशार विद्यार्थी होता. शासकिय नोकरी मिळण्याकरीता त्यास महा विद्यालयीन तसेच पदवी पर्यंत शिक्षण घेण्यास प्रोत्साहीत केले. मेंढीपालनाकरीता त्याची आता कसल्याही प्रकारची मदत होत नव्हती. दुसरा मुलगा हा शाळेमध्ये फार हुशार नव्हता त्यामुळे त्यास मेंढीपालन करीता प्रोत्साहीत करण्यात आले. तो आता जवळच्या पशुधन विस्तार केंद्रामध्ये जाउन वेगवेगळया प्रशिक्षणामध्ये सहभागी होउन नवीन - नवीन कल्पना घेऊन यायचा, बोलायचा. त्यातील काही कल्पना हया खंडुच्या व समुदायाच्या मेंढीपालनामधील 50 वर्षाचे ज्ञान यापेक्षा पुर्णतः भिन्न होत्या. ते आधुनीक वर्ग खोली मध्ये लख्ख प्रकाशामध्ये दिलेले ज्ञान होते. तरूण विद्यार्थ्यांना शिकविण्याकरीता भिंतीवर सादरीकरण, हयामध्ये रंगीत चार्टस चा वापर प्रामुख्याने व्हायचा. आकर्षक व वेगवेगळया कलरची पत्रके, घडी पत्रीका घेवुन तो घरी परतायचा.

दुपारनंतरच्या कडक उन्हामध्ये चिंचेच्या झाडाखाली विश्रांती घेत असतांना खंडु आधुनीकीकरणावर अंतर्मुख होतो. मागील वर्षी काही मेंढया अचानक मृत्युमुखी पडल्या. खंडु व त्याच्या सहकार्यांनी शवविच्छेदन केल्यानंतर त्यांना पानाच्या आकाराचे मेंढयाच्या यकृतावरती ठिपके आढळले. काही जेष्ठ मेंढपाळांसोबत चर्चा केल्यानंतर त्यांना कळलं की हल्ली चराई क्षेत्रामध्ये यकृताच्या आजारा पासुन संरक्षण मिळण्याकरीता काही विशिष्ठ पध्दतीच्या वनस्पती आढळत नाहीत. मेंढयाचा मृत्यु व धोके कमी करण्याकरीता अशा पध्दतीची वनस्पती असलेली चराई क्षेत्र शोधन्याकरीता प्रयत्न करण्यात आले. परंतु तशी चराई क्षेत्र शोधणे एवढे सोपे नव्हते. गेल्या काही कालावधी मध्ये पर्यावरणामध्ये पुष्कळ बदल घडुन आलेत ज्यामुळे या संपुर्ण पर्यावरण साखळीमध्ये काही बहुपयोगी, मुल्यवान वनस्पती झपाटयाने नष्ट झाल्यात.

चराईच्या क्षेत्र बदलण्या करीता खंडुच्या दुस-या मुलाची सहमती नव्हती. प्रशिक्षणामधुन मिळालेली औषध घेवुन तो समोर आला. त्याच्यासोबतच इतरही कुटुंबामधील मुल प्रशिक्षणामध्ये सहभागी झाली, होती त्यांनीही हा औषधीचा प्रयोग तात्काळ केला. काही दिवसानंतर काही मेंढयामध्ये गर्भपात झाला. त्यामुळे औषधी व मेंढयाचा गर्भपात यामध्ये काही संबंध असल्याचे त्यांना समजले. त्यांच्या पैकी कोणीही हे सांगु शकलं नाही की गाभण जणावरांकरीता वरील औषध सुरक्षीत आहे की, नाही ? खंडूने ह्या औषधांचा वापर ताबडतोब बंद केला आधुनिक उपाय योजनांमधील ही एक मोठी समस्या आहे. एकतर त्यांची योग्य व पुरेशी चाचणी घेतलेली नसते आणि मेंढपाळानी ते नुकसान सहन करावे ही अपेक्षा असते. म्हणुनच हल्ली मेंढपाळ आपली जनावरे लवकर मार्केट मध्ये विकायला आणतात. जास्त कालावधीपर्यंत जनावरांचे संगोपन ते करू इच्छीत नाहीत. 2-3 महिन्या मध्येच जनावरे मार्केटमध्ये नेऊन विक्री केल्या

जाते. दुसरीकडे विस्तार विभागा मधील शास्त्रज्ञ मेंढ्या किमान 9 महीने ठेवण्याचा सल्ला देतात. 'परंतु मेंढपाळाचं कोण ऐकतो ?' खंडु मनाशीच बोलला, जो शेतकरी कापसाच्या नवीन जाती आपल्या शेतात पेरतो.त्याला कांही फरक पडत नसेल, पण अश्या शेतामध्ये मेंढया चरल्यानंतर त्यांना नवीन समस्यांना तोंड दयावे लागते. हया समस्या पारंपारीक औषधोपचाराने ब-या होत नाहीत, डॉक्टरांची टिम सुध्दा या समस्यांचे योग्य निदान लावण्यामध्ये असमर्थ ठरते. एकाएकी पुष्कळ मेंढया मरण पावणे या चमत्कारीक समस्येवर उपचार सोडुन डॉक्टर मेंढपाळाना त्यांची मुळ पैदास बदलावे, किटकनाशकांची फवारणी करणे, कृमी मारण्याचे औषध वापरण्यासंदर्भात सल्ला देतात. पण हे उपचार प्रत्येक क्षेत्रीय पातळीवर खरच तपासलेले आहेत का ? नविन जातीच्या मेंढ्या पाळणे योग्य ठरेल? चाऱ्याचा तुटवडा व नविन रोगाना त्या तोंड देवू शकतील ? कदाचित त्या जातीच्या मेढ्यांचे वजन लवकर वाढत असेलही. परंतू...? एखादं मेंढरू जर रोगानी मरण पावलं तर नुकसान कुणाचे ? खंडु विचार करीत होता. किटकनाशकांचा जहरीला विषारी वास येतो. परंतु वृध्द मेंढपाळ जो डोक्यावर फेटा घालतो, ज्याला लिहता, वाचता येत नाही मोबाईल वापरता येत नाही त्याचं कोण ऐकणार.?

आज त्याच्या मुलाला काम करण्याकरीता छोटेयंत्र, ट्रॅक्टर हवा आहे. मळणी यंत्र पाहीजे, पॉवर ट्रीलर, मोटार सायकल, हवी आहे. आणि हो मोबाइल पण हवा आहे. त्याला संगणक तसेच इंटरनेट च्या वापरा विषयी पण माहीती आहे. त्याला जवळच्या विस्तार कार्यालयाकडुन हवामान तसेच बाजारभाव संदर्भात संदेश मिळतात परंतु संदेश/ माहीती लवकर विसरून जाते व गरजेच्या वेळी आठवत नाही. जुन्या काळी महत्वाच्या सवयी / माहीती ही लोकांच्या जगण्याची पध्दती, संस्कृती व त्यांचे दैनंदीन अस्तीत्व यामध्येच सामावलेली होती. व त्यामाध्यमातुन ती जिवंत राहायची. ते आपसामध्ये संवाद साधायचे की मेंढयांची योग्य व विशिष्ट पध्दतीने काळजी घेतली नाही तर देव कोपेल. ते आपसामध्ये समाज व पर्यावरणा विषयी आदर बाळगण्यास शिकवण देत असे. विशेष गवत उगवल्यानंतरच ते मेंढयांच स्थलांतर करीत परंतु आता सद्य परिस्थीती मध्ये खंडुची मुलं व त्याचे मित्र हे त्यांच्या समुदायामधील जेष्ठ मंडळींच्या या विचारांवर हसतात. तरूणांच्या मते जेष्टांचे विचार म्हणजे अशास्त्रीय, आधुनिकता नसलेले व दुलर्क्षीत आहेत.

परंतु शास्त्रीय दृष्टीकोण म्हणजे काय ? आधुनीक म्हणजे काय ? ज्ञान म्हणजे काय ? विशेष गवत जे यकृताच्या आजारापासुन मेंढयांच संरक्षण करते. अशा पध्दतीची खुप मौल्यवान गवतं तसेच वनस्पती खूप दूर्मिळ झाली. बॉटलमधील औषध सहज उपलब्ध होते. परंतु पर्यावरणामधील औषध हल्ली खुप दुर्मीळ होत चालली आहेत. प्रत्येकठिकाणी तुम्हास लोक वातावरणामधील बदलांच्या संदर्भात बोलतांना आढळतात आणि ते खरही आहे. हवामान, पावसाच्या संदर्भातील भाकीतं करणं दिवसेंदिवस खुप कठीण होत आहे. नेहमीच्या पध्दतीमध्ये मेंढीपालन काही विशीष्ठ चिंन्ह, खुणा यांवर अवलंबुन असतं परंतु ते काही आता वैध राहीलेल नाही. होय कदाचीत काही पारंपारीक पध्दती भविष्यामध्ये काम करणार नाहीत परंतु सद्यस्थीतीमधील आधुनीक पध्दती पण काम करणार नाही. खंडूला या बाबत खात्रीच वाटते.

**खरी समस्या आहे कुठे ?**

ज्यापध्दतीने खंडु सारखा मेंढपाळ कोंडीत सापडला, त्यापध्दतीने अनेक छोटे मेंढपाळ तसेच छोटे शेतकरी, गरीब वर्ग संपुर्ण जगातील कोंडीत सापडलेले आहेत. खास करून नवीन उभरत्या अर्थव्यवस्थेमध्ये मोबाईल व इंटरनेटच्या जगामध्ये फक्त पारंपारीक ज्ञान हे रोजच्या बदलांना व आव्हानांना तोंड देण्यास पुरेसे नाही. सातत्याने वेगवेगळया पातळीवर खुप बदल होत आहेत. छोटे शेतकरी व पशुधारक मोठया प्रमाणांमध्ये प्रभावीत झालेले आहे. गोंधळलेल्या स्थीतीमध्ये झुंज देण्यास समर्थ नसल्यामुळे मेंढपाळ नाहीशे होण्याच्या मार्गावर आहेत. म्हणुन समस्या नेमकेपणाने कशात आहे ?

**माहीतीचा आशय**

शेती व पशुधन संगोपन म्हणजे एकप्रकारे मानवजातीमधील हजारो वर्षापासुन साठवलेले ज्ञान होय. नवीन माहीती व ज्ञान हे त्यामध्ये सातत्याने जात वाढत राहील. भुतकाळामध्ये माहीतीची आदान प्रदान खुप संथ गतीने व्हायचे. त्यामुळे बराचसा विकसनशील समुदाय विकसीत समुदायांमधील आधुनीकतेपासुन दुर राहयचा. परंतु आज ही परीस्थीती बदललेली आहे. बटणाच्या एका क्लिकवर खुप काही माहीती उपलब्ध आहे. परंतु नवीन नवीन सर्वच अदयावत माहीती मिळवीने, सवयीमध्ये उतरविणे हे शक्य होत नाही. खास करून छोटे शेतक-यांना हे खुप अवघड वाटते.

**माहीतीचा आराखडा**

शेतकरी किंवा शेतीशी संबंधीत समुदाय एका विचीत्र परिस्थीतीमध्ये सापडलेला असुन तो त्यामधुन मार्गक्रमन करीत असतांना स्वतःला समाज व बाजारामधील सातत्याने वाढत जाणा-या गरजा यांमध्ये नेहमी अदयावत ठेवु इच्छीतो. बहुदा जास्तीत जास्त शेतकरी व सामाजीक कार्यकर्ते हे निखळ किंवा जास्तीत जास्त माहीतीने भाराउन गेलेले दिसतात, उपयोगी आवश्यक माहिती व अनावश्यक माहिती ही वेगळी करण्याची फार मोठी समस्या कदाचित त्यांना भेडसावत आहे.

**माहीती आदानप्रदानाचे स्त्रोत**

अलीकडच्या काळामध्ये माहितीचे स्त्रोत सुध्दा खुप वाढले - जसे सामाजीक कार्यकर्ते, अशासकिय संस्था, शासकिय विस्तार कार्यकर्ते, रेडीओ, टि.व्ही. इंतरनेट, वृत्तपत्र, मासीक, बाजार प्रतीनीधी, मोबाईल वरील संदेश, असे असले तरी ही वाढलेली माहीती शेतक-यांच्या उपयोगी पडणा-या ज्ञानामध्ये रूपांतरीत होईलच असे नाही. तसेच ते खात्री देउ शकत नाहीत की कुठली माहीती विश्वासार्ह आहे आणि कुठली नाही, कुणावरती विश्वास ठेवायचा? कोण चुकीच्या दिशेने घेवुन जात आहे.

**माहितीचा प्रवाह**

माहितीचा प्रवाह हा बहुतेक एकतर्फी असतो. हा प्रवाह प्रयोगशाळा, संशोधन केंद्र किंवा धोरण ठरविणारे यांच्याकडुन खाली शेतक-यांपर्यंत विस्तार कार्यकर्त्यांच्या मार्फत होत असतो. त्याची माहीती एका व्यक्तीकडुन दुस-या व्यक्तीकडे जाते, यांमध्ये खुप माहिती सुटुन जाते . तेथे योग्य किंवा समर्पक आढावा घेणारी यंत्रणा कार्यरत नाही जेणेकरून शेतक-यांच्या समस्या अगदी स्पष्टपणे प्रकाश किरणासारख्या खाली परत जातील व पुढे धोरण कर्त्याकडे जातील.

हे एक आश्चर्यच आहे की बहुतेक नवीन कार्यक्रम व योजना खुप कमी प्रमाणामध्ये यशस्वी होतात. दुर्देवाने हया सर्व नविन योजना अंमलबजावणीमध्ये प्रचंड खर्च झालेला असतो

**बदलाची गरज**

ज्या मार्गाने किंवा गतीने सर्व पुढे जात आहे. त्यामध्ये सद्यास्थीती मधील विस्तार व शिक्षणाची पध्दती, ध्येय्य, उद्देष, पोहचणारी यंत्रणा हे संपुर्णपणे बदलणे गरजेचे वाटते.



*सभोवताली होणाऱ्या बदलामुळे शेतकरी आणि धनगर समाजावर मोठे दुष्परिणाम*

**आशय पुनरावलोकन**

याकरीता शेती पध्दती कडे बघण्याचा नवीन दृष्टीकोण गरजेचा आहे. त्याकरीता पारंपारीक पध्दतींचे पुनरावलोकन करून त्यामधील धोके गुंतागुंतीचं पर्यावरण आणि आरोग्यासंदर्भातील मुद्दे याबाबत काही उत्तर आहे का ? काय नवीन बदल करणे गरजेचे आहे व काय पुर्वीचेच ठेवायचे आहे? नवीन माहीती आधीच्याच ज्ञानामध्ये जमा करायची का, आधुनिक सवयी किंवा पध्दती हया काळाच्या ओघामध्ये कितपत टिकणार हे एखादयाने तपासणे गरजेचे आहे. कुठल्या पध्दती किंवा सवयी हया लहरी हवामान व बाजारामधील चढ-उतारापासुन संरक्षित ठेवतील? काय प्रमाणामध्ये पुर्वीचे ज्ञान कमी करायचे आणि काळजीपुर्वक, एकत्रीतपणे सर्वसमावेशक ज्ञान तयार कसे करणे गरजेचे आहे, की जे ज्याला हवे असेल त्यास उपलब्ध होईल, खास करून विस्तार शिक्षक व शेतक-यांना.

**ज्ञानाची साठवन आणि पुर्नःप्राप्ती**

जनुकिय साहित्या करीता अगदी दाट काळोखी असलेल्या तंत्रज्ञानापासुन ते शित साठवणुक गृह पर्यंत वेगवळया साठवणुकी च्या पध्दती आहेत. त्या प्रमाणे आज माहीतीची साठवण पुर्वीपेक्षा खुप वेगवेगळया पध्दतीने होत आहे. तरीसुध्दा माहीती पर्यंत पोहोच व पुर्नःप्राप्ती ही अत्यल्प असलेल्या समुदायाकरीता समस्या ठरू शकते. माहितीचे सार्वजनिक स्त्रोत निर्माण करणे व त्याचे सार्वजनीक अधिपत्याखाली व्यवस्थापण करणे गरजेचे आहे. ज्या माध्यमातुन विश्वासाई आणि निःपक्षपाती माहीती मिळेल. त्यामुळे वेगवेगळया कार्यक्रमाचा यशस्वीता, अयशस्वी त्यामधील वेगवेगळया पध्दती हया सवीस्तर पणे बघता येतील. विस्तार कार्यकर्त्यांनी, शेतकरी समुदायांसोबत माहितीची देवाण घेवाण करीत असतांना या गोष्टीकडे दिशा निर्देश करणे गरजेचे आहे.

**प्रशिक्षणात्मक बाबींचे पुणर्वालोकन**

प्रत्येकाची शिकण्याची एक वेगळी हातोटी असते. लोकांची शिकण्याची पध्दती ठरविण्यामध्ये संस्कृती महत्वाची भुमीका निभावते. यासंदर्भात खुप काम झालेले आहे. परंतु माहिती देवाण-घेवाणीच्या पध्दती यांवर काम होणे गरजेचे आहे. वेगवेगळया गटांकरीता विस्तार कार्यक्रमांचे नियोजन, आराखडा तयार करीत असतांना शेतकरी समुदाय हा त्यांच्या वेगवेगळया सवयी, कृतीमधुन शिकतो हे डोक्यामध्ये ठेवणे खुपच गरजेचे आहे. प्रशिक्षणा करीता पुरेसा वेळ निश्चित करून, या वेगवेगळया पध्दती काळजीपुर्वक शेतकरी समुदायांकडे हस्तांतरीत होतात याची खात्री करणे आवश्यक आहे. त्याचे संभाव्य धोके ज्यामध्ये पर्यावरणीय परीणामांचा सुध्दा आंतर्भाव असेल. हे तपशीला मध्ये शेतकऱ्यांना समजेल याची खात्री करावी लागेल या ज्ञानाचा व प्रशिक्षणचा प्रत्यक्षात वापर करित असताना. शेतक-यांच्या सातत्याने भेटी घेवुन, शेती मधील खऱ्या समस्या ओळखणे व व्यवस्थित नोंदी, दस्तावऐवजीकरण करणे गरजेचे आहे. आलेले अनुभव, पध्दती विकसीत करणाऱ्या प्रयोग शाळेकडे पाठवीने व शेतक-यांना सुध्दा माहीतीच्या वेगवेगळया स्त्रोताविषयी माहीती पुरविणे व त्या माहीती पर्यंत कसे पोहचायचे हे कळवीणे गरजेचे आहे. इंटरनेट या सर्व बाबतीत महत्वाची भुमिका निभावु शकते. परंतु पुर्वी उल्लेख केल्याप्रमाणे, खुप जास्त माहीती हे सुध्दा घातक ठरू शकते.

**माहीतीच्या प्रवाहाचे पुनर्निदेशन**

माहीतीचा प्रवाह हा फक्त एकतर्फी नको. विस्तार कार्यकर्त्यांना बदलाचे प्रवर्तक म्हणुन पाहिले जाते. नवीन कल्पना प्रयोगशाळेपासुन शेतापर्यंत पोहोचवण्याचे काम ते करतातच एक खुप गुंतागुंतीची / अवघड भुमीका समाजामध्ये करण्याचे ते टाळतात ती म्हणजे प्रत्यक्षात शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्या व त्यांचे प्रश्न नीट समजावून घेऊन ते तंत्रज्ञ व प्रयोग शाळेपर्यंत पोहोचवणे त्यामुळेच या सर्व प्रक्रियेमध्ये विस्तार कार्यकर्ते हे समाज, शास्त्रज्ञ व धोरणकर्ते यांच्यामधील पण एक महत्वाचा दुवा ठरू शकतात. त्यांचे महत्वाचे काम म्हणजे फिल्डमधील माहीती, आकडेवारी यांच्या नोंदी घेणे जेणेकरून तज्ञ व्यावसायीकांकडुन त्यांचे विश्लेषण व कृती ठरविने सोपे होईल या नोंदीमध्ये खालील वेगवेगळया बाबींचा समावेश होऊ शकतो जसे मृत्युदर, रोग किंवा विकृतीबाबतचे सर्व्हे, वातावरणामध्ये होत असलेल्या बदलांच्या नोंदी, पिकांची यशस्वीता व नापीकी, नवीन तंत्रज्ञानाचे अनुभव व व्यवस्थापन पध्दती इत्यादी. अशा पध्दतीना प्रोत्साहीत केल्यामुळे समाजाविषयी त्यांचा दृष्टीकोण केवळ बदलणार नाही तर ते भविष्यामधील वाढत्या अनिश्चितता मध्ये खुप महत्वाची व प्रदिर्घ कालावधीपर्यंत भुमिका करू शकतील. खूप कांही करण्यासारखे आहे. या नवीन बदलाच्या वाऱ्याच्या लाटेत समाज ओढला जातो. नुकसान होते, काही अशा पल्लवीत होतात. अशा मध्ये खंडूसारखे शेतकरी पूर्ण कोलमडून जातील. एकच आशा बाळगली जाऊ शकते की येऊ घातलेल्या विकासाच्या प्रयत्नामध्ये यश आणि नव्या आशा निर्माण व्हाव्यात व हानी कमी व्हावी. आणि त्यांचा ऐतिहासिक, पारंपारिक ज्ञान साठा त्यांना बदलांच्या लाटेत खंबीर व ठाम पणे राहण्यास मदत करेल.

***नित्या सांबामुर्ती घोटगे,*** *अंथरा*
*एफ-लंताना गार्डन, एन.डी.ए. रोड,*
*भावधन, पुणे -411 021 महाराष्ट्र भारत*
*Email : anthra.pune@gmail.com*

***मराठी अनुवादः सुरेश लुले***

***मूळ लेख : Surviving the winds of change - A shepherds dilemma***
***(Vol. 15, No. 3, Sept. 2013)***